05 TO 11 SEPTEMBER 2022 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 9/3/2022 8:54 PM Page 1

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १०  अंक : ३७  सोमवार दि. ५ सप्टेंबर २०२२ ते रविवार दि. ११ सप्टेंबर २०२२  पाने : ८  किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com  महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक  crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## गरिबीमुळे पित्याची दैनावस्था झाली मुलांना मारून त्याने आत्महत्या केली

चंद्रपूर/क्राईम रिपोर्टर

आर्थिक हलाकीमुळे माणसावर कोणती परिस्थिती ओढवेल हे सांगता येत नाही. गरिबीमुळे घर चालवणे आणि मुलांना पोसणे अशक्य झाल्यामुळे एका शिक्षकाने आपल्या दोन मुलांना ठार मारून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना चंद्रपूरमध्ये घडली आहे. या घाणेमुळे संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे. वरोरा शहरात स्वतःच्या दोन चिमुकल्यांना विष देत पित्याने विषप्राशन करत आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उजेडात ...पान २ वर

## जन्मदात्या आईचे श्राद्धसुद्धा मुलांसाठी खर्चिक ठरले अवघ्या ५०० रुपयांसाठी भावाने भावाला ठार मारले

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी

एक काळ असा होता कि माणूस कुटुंबातील नाती जपण्यासाठी स्वतःच्या प्राणाची आहुती द्यायलाही मागेपुढे पाहत नसायचा. कारण त्यांच्या समोर प्रभू रामचंद्राचा आणि भरताचा आदर होता. पण ते बंधुप्रेम आजच्या कलयुगात कुठेच बघायला मिळत नाही. पूर्वी भावाच्या पत्नीला दीर आईच्या रुपात बघायचा. आज दीर भावजयीचे नाते कलंकित झालेले बघायला मिळतेय. कुटुंबातील नात्याच्या मर्यादा सहजपणे ओलांडताना माणूस पाप पुण्याचा जराही विचार करायला तयार नाही. समाजाची त्याला जराही भीती राहिलेली नाही. त्यातच आजकाल प्रत्येक माणसासाठी पैसा महत्वाचा असल्याने पैशासाठी माणूस रक्ताच्या नात्याचीही जान ठेवत नाही. त्यामुळे मुलांनी आई -बापाचा, भावाने भावाचा, चुलत्याने पुतण्याचा, पतीने पत्नीचा खून केल्याच्या अनेक घटना घडत आहेत. खास करून ग्रामीण भागात अशा घटना अधिक घडतात. त्याही जमिनीच्या किंवा संपत्तीच्या वादातून अशा घटना घडत असतात. दक्षिण सोलापुरातील पिंजारवाडी येथे माणुसकीला आणि रक्ताच्या नात्याला कलंक लावणारी घटना घडली आहे. आईच्या श्राद्धात खर्च केलेले ५०० रुपये परत केले नाहीत म्हणून मोठ्या भावाने धाकट्या भावाचा खून केला. रक्ताच्या नात्याला कलंकित करणाऱ्या या घटनेमुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली असून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.






सोलापूर आईच्या श्राद्धात केलेल्या खर्चात एका मंगल भांडारचे पाचशे रुपये उधारी शिल्लक होती. यावरून उद्‌भवलेल्या वादातून मोठ्या भावाने छोट्या भावाचा काटा काढल्याची धक्कादायक घटना सोलापूर येथील वळसंग पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. मोठ्या भावाने छोट्या भावास दगड व सळईने मारहाण करून त्याला ठार केले. ही घटना २८ ऑगस्ट रोजी दक्षिण सोलापूर तालुक्यातील पिंजारवाडी येथे घडली आहे. याबाबत अधिकृत माहिती सहायक पोलिस निरीक्षक अतुल भोसले यांनी दिली.

३० ऑगस्ट रोजी वळसंग पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला आहे. सैफन घूडूसाब नदाफ (वय ४१, रा. पिंजारवाडी, दक्षिण सोलापूर) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. शहनाझ नदाफ यांनी याबाबत वळसंग पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. पोलिसांनी मीरालाल घुडूसाब नदाफ, सलीम मीरालाल नदाफ, रफिक मीरालाल नदाफ, नियामतबी मीरालाल नदाफ यांना अटक केले आहे. आईचे श्राद्ध करण्यासाठी केलेल्या खर्चावरून फक्त पाचशे रुपयांसाठी मोठ्या भावाने छोट्या भावाचा खून केल्यामुळे सोलापुरात हळहळ व्यक होत आहे. एक वर्षापूर्वी मीरालाल व सैफन यांच्या आईचे निधन झाले होते. या दोघां भावांनी एकत्रितरित्या आईचे श्राद्ध करून गोरगरिबांना अन्नदान केले होते. यावेळी गावातील एका मशिदीत असलेल्या मंगल भांडारमधून भांडे भाड्याने घेतले होती. या मंगल भांडारचे पाचशे रुपये उधारी शिल्लक राहिली होती. ही उधारी मागण्यासाठी मशिदीचे विश्वस्त जमादार हे २८ ऑगस्ट रोजी राहत्या घरी सकाळी सैफन नदाफ यांच्या घरी गेले होते. ...पान २ वर

## मोबाईलच्या खर्चावरुन दोघांत वाद झाला रागाच्या भरात मित्रानेच मित्राचा खून केला

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत अक्षय चव्हाण

अन्न, वस्त्र, निवारा, वाहन आणि मोबाईल हे पाच घटक आजच्या कलीयुगात मानवी जीवन जगण्यासाठी अत्यावश्यक झाले आहेत. आजकाल प्रत्येकाच्या हातात अथवा खिशात अँड्रॉईड मोबाईल असतो. अशिक्षीत तरुणांना देखील मोबाईलमधील विविध ॲप आणि फंक्शन गरजेनुसार कमी अधिक प्रमाणात समजू लागले आहेत. मोबाईलच्या माध्यमातून तरुण वर्गाची डिजीटल इंडीयाच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. बरेच व्यवहार पार पाडण्यासाठी अँड्रॉईड मोबाईलची गरज भासते. सरकारने तशी गरजच निर्माण केली आहे. कौन बनेगा करोडपती या छोट्या पडद्यावरील शो मधे अमिताभ बच्चन विजेत्या स्पर्धकाला त्याने जिंकलेली बक्षीसाची रक्कम मोबाईलच्या माध्यमातून त्याच्या खात्यात जमा झाल्याचे दाखवत असतात.





साधारण विस वर्षापुर्वी मोबाईल बाळगणाऱ्या दोन पोलिस कर्मचाऱ्यांना जळगावच्या तत्कालीन पोलिस अधिक्षकांनी निलंबीत केले होते. त्या काळात केवळ कॉलींगसाठी मिळणारा साधा आणी अवजड मोबाईल दोन पोलिस कर्मचाऱ्यांसाठी जणू काही गुन्हा ठरला होता. आज जमाना बदलला आहे. नवनवीन फिचर असणारे मोबाईल हे एक दुधारी शस्त्र देखील बनल्याचे वास्तव नाकारता येणार नाही. वापरण्यास दिलेला मोबाईल खराब केल्याच्या कारणावरुन एकाची हत्या झाल्याची घटना जळगाव शहरात घडली. अमरसिंग ओंकार चव्हाण आणि प्रदीप ओंकार चव्हाण हे दोघे मोलमजुरी करणारे भाऊ जळगाव शहरातील नंदनवन कॉलनीत राहतात. या दोघा भावांचा निलेश पवार हा मित्र आहे. अमरसिंग आणि प्रदिप या दोघा भावांच्या अडीअडचणीत निलेश हा धावून जाणारा मित्र म्हणून ...पान २ वर

## नोकरीवरून काढताच दोघांचे संबंध तुटले नोकराने मालकालाच भर रस्त्यात लुटले

जळगाव/क्राईम रिपोर्टर

सुडाची भावना खूप वाईट असते. कारण त्यातून माणूस कुठल्याही थराला जातो आणि जोवर समोरच्यावर सूड उगवत नाही तोवर त्याचे मन शांत होत नाही. जळगावमध्ये अशाच एका घटनेत तेलाच्या व्यापाऱ्याकडे काम करणाऱ्या एका नोकराला मालकाने कामावरून काढून टाकले होते. त्यामुळे तो भयंकर चिडला आणि मालकाला धडा शिकवण्यासाठी त्यांनी मित्रांच्या सहाय्याने भर रस्त्यात मालकाचे अडीज लाख रुपये लुटले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



नोकरीवर ठेवलेल्या कंपनी मालकासोबत काही कारणावरुन बिनसले अथवा वाद झाले तर त्याचा वचपा काढण्यासाठी काही नोकर तयारच असतात. कामावरुन कमी केलेल्या नोकराने साथीदारांच्या मदतीने पुर्वीच्या मालकालाच लुटण्याचा प्रकार घडवून आणला. तेल पॅकींग कंपनीचा मालक माल विक्रीचे १५ ते २० लाख रुपये रोख स्वरुपात दररोज रात्री घरी घेवून जात असल्याची माहिती पुर्वीच्या नोकराने आपल्या साथीदारांना दिली. त्या माहितीच्या आधारे उद्योजकाला लुटण्याचा कट रचण्यात आला. तो कट यशस्वी देखील झाला. मात्र पोलिसांचे हात एवढे लांब असतात की खाकीवर्दीचा कापड देखील कधी कधी कमी पडतो ...पान २ वर



## कर्जबाजारी किरणचा प्लान फेल गेला अपरहणकर्त्यांच्या हातून कंत्राटदार मेला





सांगली/क्राईम रिपोर्टर

कर्जबाजारी माणूस कर्ज फेडण्यासाठी काय करावे या सतत चिंतेत असतो. मात्र विचार करूनही जेंव्हा काही सुचत नाही तेंव्हा मात्र त्याची पावले गुन्हेगारीकडे वळतात. पण ज्यांनी कधीच गुन्हा केलेला नसतो असा माणूस जेंव्हा एखादा गुन्हा करायला जातो तेंव्हा त्याच्या हातून भलतेच घडते. कारंदवाडी येथील किरण रणदिवे याच्या बाबतीतही तसेच घडले. किरण कर्जबाजारी होता आणि त्याला कर्ज फेडण्याची चिंता होती. पण काहीच उपाय सापडेना म्हणून त्याने आपल्या दोन साथीदारांच्या मदतीने एका ठेकेदाराचे अपहरण केले. पण हे अपहरण करताना त्याचे तोंड बंद करण्याच्या प्रयत्नात त्याच्या हातून त्या ठेकेदाराचा खून झाला. करायला गेले एक आणि घडले भलतेच. अखेर त्याला तुरुंगाची हवा खावी लागली.

एखाद्याची आर्थिक परिस्थीती बिकट झाली की तो रस्त्यावर येतो. त्याला कोणाताही कामधंदा मिळत नाही, त्याचे खाण्या पिण्याचे वांदे सुरू होतात अशावेळी त्याच्या डोक्यात वेगवेगळे विचार येत असातात. शॉर्टकटने पैसा मिळविण्यासाठी ती व्यक्ती नको तो उपदयाप करून बसते.एखाद्या श्रीमंत माणासाचे अपहरण करून त्याच्याकडून खंडणी उकळून पैसा मिळवायचा असा विचार ती करते. वाळवा तालुक्यातील कारंदवाडी येथील किरण रणदिवे हा कर्जबाजारी झाला होता. त्याने अनेकाकडून पैसे उचलले होते. त्यामुळे त्याच्या अंगावर कर्जाचा डोंगर झाला होता. त्यातच त्याला कोणताही कामधंदा ही मिळत नव्हता. या कठीण आर्थिक परिस्थीतीत तो चहाला देखील महाग झाला होता. त्याचे खाणे ...पान २ वर

## दारूच्या पार्टीत त्यांनी हंगामा केला चौघांच्या हातून चायनीजवाला मेला

उल्हासनगर/किरण तेलगोटे

दारूची मैफील सुरु झाली कि पिणाऱ्यांना नको नको ते विषय आठवतात. त्यात दारू डोक्यात भिनली कि मग पिणाऱ्याला होश राहत नाही आणि तो कोणालाही काही बोलू लागतो. शिव्याही देतो, त्यातून वाद सुरु होतात आणि या वादाचे हाणामारीत रुपांतर होते. उल्हासनगरमध्ये एकाच गावातील चौघांची दारूची पार्टी रंगली होती. मात्र दारूची नाश झाल्यावर त्यांच्यात वाद सुरु झाला आणि चौघांनी मिळून दीपक भट नावाच्या तरुणाची हत्या करून त्याचा मृतदेह नाल्यात फेकला. या प्रकरणी पोलिसांनी एका आरोपीला अटक केली असून इतरांचा शोध सुरु आहे.



कॅम्प ५ मधील दसरा मैदान परिसरातील शिवसेना शाखेच्या बाजूला नालेसफाईचे काम सुरू असताना २४ ऑगस्टला सकाळी नाल्यात कुजलेल्या अवस्थेत मृतदेह मिळाला होता. या प्रकरणात मृतदेहाच्या हातावरील नावाच्या टॅटूवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध घेतला, अशी माहिती पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते यांनी दिली. मृतदेह आढळल्यावर सफाई कामगारांनी ही माहिती हिललाईन पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून मृतदेह उत्तर तपासणीसाठी मध्यवर्ती रुग्णालय त्यानंतर जे. जे. रुग्णालयात नेला. तेव्हा ...पान २ वर

## क्रिकेट सामन्याच्या रात्री अचूक साधला नेम मित्रांनीच केला सफाई कामगाराचा गेम

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर



मैत्रीत सर्व मित्रांनी बंधुत्वाच्या नात्याने राहायचे असते, तरच मैत्री टिकून राहते. पण ज्यांच्याकडे पैसे असतात त्यांना पैशाचा माज असतो. अशावेळी ते आपल्या इतर मित्रांना तूच्छ लेखीत असतात. पण असे करणे कधीतरी प्राणावर बेतू शकते. इचलकरंजी येथे असेच झाले. एक सफाई कामगार आपल्या इतर दोन मित्रांना तुच्छ लेखायचा. स्वतःकडे पैसे असतानाही मित्रांकडूनच लुबाडून खायचा. त्याच्या या कृत्याचा मित्रांना राग होता आणि याच रागातून एका रात्री त्याला दारू पिण्यासाठी बोलावले आणि तिथेच त्याचा गेम केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

राहुल दियालु हा इचलकरंजी महानगरपालिकेत सफाई कामगार म्हणून काम करीत होता.तो आपल्या आई वडिलासह तीन बत्ती चार चौकात राहयला आहे.तो सफाई कामगार म्हणून काम करीत असल्याने सकाळी सहा वाजता तो कामाला गेला की दुपारी १ ते २ च्या दरम्यान काम संपवून कामावरून घरी येत असे. राहुल याचा मित्र परिवार ही मोठा होता. त्याचे भाग्यरेखा टॉकीज समोरील कामगार चाळीत नेहमी येणे जाणे असायचे. दातार मळा ...पान ६ वर

## कॉल सेंटरच्या आड काम सेंटरचा चाळा अश्लिल सेक्स चॅटींगचा पर्दाफाश झाला



मुंबई/एस.कुमार

कॉल सेंटर्स मध्ये नोकरी करणाऱ्या तरुणीचे आयुष्य हे प्रातिनिधीक स्वरूपाचं असतं.येथे उच्चशिक्षण आणि आय.टी. इन्डस्ट्रितल्या पर्यायांबरोबरच बी.पी.ओ, कॉल सेंटर्स आणि आय.टी.ई. एसच्या विस्तारलेल्या कार्यक्षेत्रामुळे तरुणांना अनेक संधी आणि सुरुवातीलाच मोठ्या पगाराची नोकरी मिळतं. या पगाराबरोबरच अतिरिक्त बोनस, पंचतारांकीत चकचकीत ऑफिसेस, जेवणाची आणि वाहनाची मोफत सोय ह्या गोष्टी तरुणांना सहजपणे आकर्षित करतात. त्यांना मिळत असलेल्या संधी आणि मोबदले पाहून अवाक व्हायला होते.

मध्यंतरी 'मेट्रो' ह्या हिंदी चित्रपटात दिग्दर्शक अनुराग बसूने आजच्या पिढीच्या कॉल सेंटर लाईफस्टाईलचे प्रभावी आणि वास्तव चित्र थोड्याफार प्रमाणात मांडले होते. कॉल सेंटर्स म्हणजे काय तर अमेरिकन कंपन्यांच्या जगभरातील ग्राहकांना भारतातून टेलिफोन द्वारे किंवा ऑनलाईन सेवा पुरवणे. आता फक्त अमेरिकाच नाही तर यू.के, ...पान ६ वर

05 TO 11 SEPTEMBER 2022 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 9/3/2022 8:58 PM Page 1



पान १ वरून....

## गरिबीमुळे पित्याची दैनावस्था ...

आली आहे. मुलाना संपविणाऱ्या पित्याचा मृतदेह वर्धा जिल्ह्यातील गिरड पोलीस ठाण्याच्या हद्दीतल्या शेत शिवारात आढळला. पोलिसांना तपासादरम्यान आढळलेल्या सुसाईड नोटमध्ये धक्कादायक कारण समोर आलं आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा शहरातल्या बोर्डा गावात संजय कांबळे आपल्या कुटुंबासोबत रहात होते. संजय कांबळे, त्यांची पत्नी, ६ वर्षीय मुलगा आणि ३ वर्षांची मुलगी असं हे कुटुंब. यातील पिता संजय कांबळे घरीच खाजगी शिकवणी वर्ग घेत होता. तर पत्नी एका महाविद्यालयात प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून कंत्राटी तत्त्वावर कार्यरत आहे. कोरोनाआधी संजय कांबळे यांचे शिकवणी वर्ग उत्तम चालत असत. मात्र कोरोनानंतर शिकवणी वर्गात मुलांची संख्या रोडावल्याने कुटुंबाचा गाडा चालविणे अशक्य झाला होता. संजय कांबळे याने अनेकदा याबाबत निराशा व्यक्त केली होती. मला ही मुले पोसता येत नसतील तर त्यांचा जीव घ्यावा लागेल असंही त्यानी जवळच्या व्यक्तींजवळ बोलून दाखविलं होतं. शुक्रवारी घरात कुणीही नसताना संजय कांबळेने आपल्या दोनही मुलांना विष देऊन त्याची हत्या केली. त्यानतंर घराला कुलूप लावत संजय कांबळे फरार झाला. कामावरून घरी परतलेल्या कांबळे यांच्या पत्नीला हा सारा प्रकार कळताच तिने आरडाओरड करुन शेजाऱ्यांच्या मदतीने मुलांना रुग्णालयात नेले खरे मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. प्रकरण पोलिसात दाखल होताच यातील गांभीर्य लक्षात घेत पोलिसांनी तपास सुरु केला. यावेळी त्यांना वर्धा जिल्ह्यातल्या गिरड पोलीस स्टेशनच्या हद्दीतील साखरा शेतशिवारात एक मृतदेह आढळल्याची बातमी मिळाली. हा मृतदेह संजय कांबळे याचाच असल्याची पुष्टी झाली. स्वतः विषप्राशन करत संजय कांबळे यांनी आत्महत्या केली. पोलिसांनी आता याप्रकरणी अधिक तपास सुरु केला आहे. बेताची आर्थिक स्थिती, कोरोना काळानंतर बिघडलेले कौटुंबिक बजेट आणि महागाईचा विस्फोट यामध्ये चौकोनी कुटुंब चालविणे अवघड झाल्याची स्थिती या घटनेने स्पष्ट केली आहे. अशा स्थितीत समुपदेशन आवश्यक असल्यास त्यांनी पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन चंद्रपूर पोलिसांनी केले आहे.

## जन्मदात्या आईचे श्राद्धसुद्धा ...

पण ही रक्कम मीरालाल नदाफ यांच्या कडून घ्या असे सैफन नदाफ यांनी सांगितले होते. पाचशे रुपयांवरून मीरालाल नदाफ हा छोटा भाऊ सैफन नदाफ यावर चिडून होता. सैफन नदाफ हा २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी शेतातील मोटार चालू करण्यासाठी गेला होता. त्यावेळी सैफन हा एकटा असल्याची संधी साधून मीरालाल नदाफ यांनी पाच शे रुपयांसाठी कर्जदारांना माझ्या घरी पाठवतो का असा जाब विचारत मारहाण करण्यास सुरुवात केली. यावेळी मीरालाल यांचा मुलगा रफिक नदाफ याने पाठीमागून येऊन सैफन नदाफ यांचे हातपाय पकडले, मीरालाल नदाफ यांनी दगडाने, सळईने छोटा भाऊ सैफन नदाफ यांच्या डोक्यावर जबर मारहाण केली.मीरालाल नदाफ यांची पत्नी, नियामतबी नदाफ, दुसरा मुलगा सलीम नदाफ यांनी सैफन नदाफ यांच्या डोक्यावर व सर्वांगास जबर मारहाण केली. शहनाज नदाफ यांनी उपचारासाठी पती सैफन यांस सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. पण डोक्याला गंभीर इजा झाल्याने जखमी उपचारास प्रतिसाद देत नव्हता. अखेर ३० ऑगस्ट रोजी दुपारी सैफन यांची प्राणज्योत मालवली.मृत झाल्याची माहिती मिळताच पिंजारवाडी येथील ग्रामस्थांनी सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एकच गर्दी केली होती. फक्त पाचशे रुपयांसाठी भावाने भावाला संपविले अशी चर्चा करत ग्रामस्थ हळहळ व्यक्त करत होते.

## मोबाईलच्या खर्चावरून दोघांत ...

ओळखला जात होता. गणेश चव्हाण आणि प्रदीप चव्हाण हे दोघे मोलमजुरी करणारे मित्र एकमेकांना परिचीत होते. प्रदिपकडे अँड्राईड मोबाईल होता. प्रदीपकडे असलेला मोबाईल गणेशने काही दिवसांसाठी वापरण्यास मागितला होता. गणेशची गरज आणि अडचण लक्षात घेत माणूसकीच्या नात्याने प्रदीपने गणेशला मोबाईल वापरण्यास दिला. काही दिवसांनी गणेशने प्रदीपला त्याचा मोबाईल परत केला मात्र तो खराब झालेला होता. त्या मोबाईलचा डिस्प्ले खराब झालेला होता. डिस्प्ले दुरुस्त करण्यासाठी येणारा खर्च प्रदीप यास पेलवणारा नव्हता. मोबाईलचा डिस्प्ले खराब झाल्यामुळे प्रदीपची मोबाईलवरील सर्वच कामे खोळंबली. कुणाचा कॉल आला ते त्याला समजत नव्हते. डिस्प्लेच नसल्यामुळे एकंदरीत सर्व कामे खोळंबल्याने प्रदीप मनातून नाराज होत गणेशवर चिडला होता. मोलमजुरी करणाऱ्या प्रदीपला गणेशचा प्रचंड राग आला होता. तो गणेशला मोबाईल दुरुस्तीचे पैसे मागत होता. मात्र जवळ पैसे नसल्यामुळे गणेश त्याला मोबाईल दुरुस्तीचे पैसे तात्काळ देवू शकत नव्हता. त्यातून दोघात शाब्दिक बाचाबाची सुरु झाली होती. २१ ऑग़स्ट रविवारचा दिवस उजाडला. रविवारच्या दिवशी मोलमजुरी करणाऱ्या तरुणांना मद्यपानाची आठवण येत असते. जळगाव शहरातून जाणाऱ्या महामार्गालगत गणेश कॉलनी नजीक असलेल्या मधुशाळेत अर्थात दारुच्या अड्ड्यावर सर्व मजूर त्यांच्या आवडी आणि सवडीनुसार मद्यपानासाठी येत असतात. प्रदिप आणि गणेश या दोघांचा मद्यपान हा सामायीक विषय गणेश कॉलनी स्टॉपवरील मधुशाळेत मार्गी लागत असे. या विषयाची पुर्ती करण्यासाठी दोघांची याठिकाणी हमखास हजेरी लागत असे. रविवार २१ ऑगस्ट रोजी दोघे मद्यपानाच्या निमित्ताने एकत्र आले होते. गणेश दिसताच प्रदीपच्या संतापाचा पारा चढला. मोबाईल दुरुस्तीसाठी लागणाऱ्या खर्चाची तो गणेशला मागणी करु लागला. बघता बघता दोघांमधे वादाची ठिणगी पडली. शब्दामागे शब्द वाढत जावून दोघांमधे हाणामारी सुरु झाली. आपल्याला होत असलेली मारहाण बघून गणेशने त्याचा मित्र शैलेश सुभाष राठोड यास फोन करुन बोलावून घेतले. फोनवर माहिती मिळताच शैलेश राठोड याच्यासह अक्षय अजय चव्हाण, आणि युवराज जाधव असे घटनास्थळी धावून आले. सुरुवातीला गणेशची बाजू घेत अक्षय चव्हाण याने प्रदीप चव्हाण यास समजावण्यास सुरुवात केली. मात्र मोबाईल दुरुस्तीसाठी लागणाऱ्या खर्चाची मागणी करण्याचा हेका प्रदीपने लावून धरला होता. त्यामुळे गणेशच्या मदतीसाठी धावून आलेल्या शैलेश राठोड, अक्षय चव्हाण आणि युवराज जाधव या तिघांनी प्रदीपला धक्काबुक्की सुरु केली. दरम्यान प्रदीपच्या बाजूने त्याचा भाऊ अमरसिंग आणि मित्र निलेश पवार एकत्र आले. दोन गट आमनेसामने भिडले. दरम्यान गणेशच्या बाजूने असलेल्या अक्षयने प्रदीपचा भाऊ अमरसिंग यास दगड फेकून मारला. दगडाच्या घावाने अमरसिंग याच्या डोक्याला जखम झाली. आपला मित्र अमरसिंग यास अक्षयने दगड मारल्याचे बघून निलेश पवार चिडला. त्याने आपल्या कब्जातील चाकू बाहेर काढला. त्या चाकूने त्याने अक्षय चव्हाण याच्या छातीवर आणि पोटावर सपासप वार करण्यास सुरुवात केली. चाकूचे सपासप वार झाल्यामुळे अक्षय चव्हाण गंभीर जखमी झाला. जखमी अक्षयचा बचाव करण्यासाठी त्याचा मित्र युवराज जाधव धावून आला. युवराज जाधव मधे आल्याचे बघून निलेशने त्याच्यावर देखील चाकूचे घाव घालण्यास सुरुवात केली. चाकूचे पाठीवर घाव बसल्याने युवराज हा देखील जखमी झाला. दोघे जखमी झाल्याचे बघून अमरसिंग, निलेश आणि त्यांचे इतर मित्र सर्वच जण घटनास्थळावरुन पळून गेले. या खूनी हल्ल्याची घटना घडत असतांना परिसरात एकच हल्लकल्लोळ माजला. परिसरात तणाव निर्माण झाला. या घटनेची माहिती सर्व प्रथम जिल्हापेठ पोलिस स्टेशनचे पोलिस उप निरीक्षक प्रदीप चांदेलकर यांना समजली. पोलिस उप निरीक्षक प्रदीप चांदेलकर यांची या घटनेच्या दिवशी रविवारी सुटी होती. याच दिवशी त्यांचा वाढदिवस देखील होता. घरात त्यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमाची तयारी सुरु असतांना त्यांना सर्वप्रथम या घटनेची माहिती मिळाली. माहिती मिळताच त्यांच्यातील पोलिस अधिकाऱ्याचे कर्तव्य जागे झाले. त्यांनी वाढदिवस आणि सुटी बाजूला ठेवत अंगावर वर्दी चढवली. तात्काळ दुचाकीला किक मारुन त्यांनी घटनास्थळ गाठले. घटनास्थळावर अक्षय चव्हाण हा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. त्यांनी लागलीच जबर जखमी असलेल्या अक्षय चव्हाण याच्यासह युवराज जाधव अशा दोघांना सामान्य रुग्णालयात रवाना करण्याची व्यवस्था केली. त्यानंतर त्यांनी सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता तसेच पोलिस निरीक्षक अरुण धनवडे यांना घटनेची माहिती दिली. आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी सर्वप्रथम धावून आलेल्या पोलिस उप निरीक्षक प्रदीप चांदेलकर यांचे सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता यांनी आभार व्यक्त केले. सामान्य रुग्णालयात अक्षय अजय जाधव यास डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. जखमी युवराज जाधव याच्यावर उपचार करण्यात आले. सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता, जिल्हापेठ पोलिस स्टेशनचे पो.नि. अरुण धनवडे आदींनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेत परिस्थिती आणि घटनाक्रम शैलेश राठोड याच्याकडून समजून घेतला. मयत अक्षय चव्हाण याचा भाऊ शैलेश अजय चव्हाण याने दिलेल्या फिर्यादीनुसार जिल्हापेठ पोलिस स्टेशनला निलेश उर्फ बाळा पवार (मुळ रा. कुसुंबे ता. रावेर, सध्या रा. रिंगरोड जळगांव) आणि अमरसिंग ओंकार चव्हाण (रा. नंदनवन कॉलनी, जळगांव) तसेच इतर नाव गाव माहिती नसलेल्या तरुणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा भाग ५, गु.र.नं. ५२८/२०२२, भा.द.वि. ३०२, ३०७, ५०४, ५०६, ३४ नुसार दाखल करण्यात आला. या गुन्ह्यातील जखमी संशयीत आरोपी अमरसिंग हा पोलिसांच्या निगराणीखाली सामान्य रुग्णालयात उपचार घेत होता. तर चाकूहल्ला करणारा निलेश उर्फ बाळा पवार हा फरार होता. पोलिस त्याच्या मागावर होते. फरार असलेला निलेश प्रविण पवार (रा. रिंग रोड जळगाव) हा शिरसोली येथे लपून बसला असल्याची माहिती एमआयडीसी पोलिस स्टेशनचे पोलीस हेड कॉन्स्टेबल जितेंद्र राठोड यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे एमआयडीसी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल मोरे, पोलीस उपनिरीक्षक दीपक जगदाळे, सहायक फौजदार अतुल वंजारी, जितेंद्र राठोड, समाधान टहाकळे, शुद्धोधन ढवळे, इमरान सय्यद, किशोर पाटील, राकेश बच्छाव, मुदस्सर काझी तसेच जिल्हा पेठ पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख, सलीम तडवी, रविंद्र साबळे, जुबेर तडवी, अमित मराठे आदींनी त्याचा माग काढण्यास सुरुवात केली. या पथकाने शिरसोली येथील जंगलात लपून बसलेल्या निलेश पवार यास शिताफीने ताब्यात घेत अटक केली. पुढील तपासकामी अटकेतील निलेश पवार यास जिल्हापेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या गुन्ह्याच्या तपासकामी पोलिस उप निरीक्षक गणेश देशमुख, हे.कॉ. अनिल झुंजारराव, पो.कॉ. योगेश साबळे, समाधान पाटील, सलीम शेख, पहुरकर यांचे सहकार्य लाभले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे, अप्पर पोलिस अधिक्षक चंद्रकांत गवळी, सहायक पोलिस अधिक्षक कुमार चिंता, जिल्हापेठ पोलिस स्टेशनचे पो.नि. अरुण धनवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक किशोर पवार व त्यांचे सहकारी करत आहेत. या गुन्ह्याकामी पोलिस उप निरीक्षक प्रदीप चांदेलकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## नोकरीवरून काढताच दोघांचे ...

असे म्हटले जाते. एमआयडीसी परिसरात २० ऑगस्टच्या रात्री दहा वाजेच्या सुमारास उद्योजकास लुटण्याचा प्रकार घडला. हा गुन्हा उघडकीस येण्यास वेळ लागणार नाही असे भाकीत वर्तवण्यात आले होते, ते भाकीत खरे ठरले. अमीत बद्रीपसाद अग्रवाल हे खाद्य तेल पॅकींग कंपनीचे मालक आपल्या वडीलांसह त्यांच्या कारने २० ऑगस्ट रोजी रात्री घरी जात होते. वाटेत विज वितरण सब स्टेशनजवळ त्यांच्या कारला एका ट्रिपल सिट मोटार सायकलस्वाराने धडक दिली. अपघात झाल्याचा बनाव करुन त्याने अमित अग्रवाल यांना वैद्यकीय उपचारासाठी पैशांची मागणी केली. पुढच्याच क्षणी त्याने चाकूचा धाक दाखवत दम देण्यास सुरुवात केली. कारचालक रामेश्वर घुले याने विरोध केला असता तिघांपैकी एकाने त्याला चाकूचा धाक दाखवत त्याचा मोबाईल हिसकावून घेतला होता. दरम्यान एकाने कारच्या पाठीमागील सिटवर ठेवलेली रोख रकमेची कापडी पिशवी जबरीने काढून घेतली. त्या पिशवीत २ लाख ४९ हजार ८०० रुपये होते. त्याच वेळी अजून तिन तरुण त्याठिकाणी आले. अगोदरच्या तरुणांकडून ती पिशवी नंतर आलेल्या तरुणांनी आपल्या ताब्यात घेत तेथून पलायन केले होते. तसेच अपघात घडवून आणणाऱ्या तिघांनी चाकूच्या धाकावर अमित अग्रवाल यांचे २० आणि १५ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल, एटीएम व पॅन कार्ड देखील काढून घेतले होते. या घटनेप्रकरणी एकुण २ लाख ८५ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जबरी लुट झाल्याप्रकरणी एमआयडीसी पोलिस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेची माहिती समजताच अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी, सहायक पोलीस अधिक्षक डॉ. कुमार चिंथा व एमआयडीसी पोलीसांनी घटनास्थळाला भेट दिली. एमआयडीसी पोलीसांनी लागलीच या गुन्हयाचा तपास सुरु केला. सदरचा गुन्हा उमाळा येथील काही तरुणांनी केला असल्याची माहीती तपासाअंती मिळाली. लुटारु नेरीच्या दिशेने गेले असल्याची माहीती पोलीस निरीक्षक प्रताप शिकारे यांना समजली. त्या माहितीच्या आधारे गुन्हे शोध पथकातील स.फौ. अतुल वंजारी, पो.ना किशोर पाटील, इम्रान सैय्यद, सुधीर सावळे, सचिन पाटील, मुकेश पाटील, दिपक चौधरी, मुदस्सर काझी, साईनाथ मुंढे, चालक इम्तीयाज खान आदींचे पथक नेरी गावाच्या दिशेने रवाना झाले. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे नेरी येथील हॉटेल मोहीनी येथून शुभम ज्ञानेश्वर जाधव (२२) रा. जाधव गल्ली, उमाळा – जळगाव, प्रथमेश गंगाधर कोलते (१९) रा. हनुमान मंदीराजवळ, उमाळा – जळगाव, व एक अल्पवयीन अशा तिघांना पथकाने ताब्यात घेतले. त्या तिघांकडून गुन्हयात वापरलेली बजाज प्लसर मोटारसायकल हस्तगत करण्यात आली. या तिघांचा या गुन्हयात सहभाग असल्याचे चौकशी व तपासाअंती निष्पन्न झाले. ताब्यातील तिघांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे लुटीत सहभाग असलेल्या दिपक गजानन मोहीते, रा. उमाळा – जळगाव, उमेश रमेश मोहीते रा. कुसुंबा गोशाळेच्या मागे, जळगाव, तेजस संतोष इंगळे, रा.सुरेशदादा जैन नगर, कुसुंबा – जळगाव, कृष्णा रविंद्र पारधी, रा. कुसुंबा – जळगाव यांची नावे पुढे आली. या सर्वांना देखील शिताफीने ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून देखील गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल तपासकामी जप्त करण्यात आली. अधिक सखोल तपासात या गुन्ह्यात सद्यस्थितीत एकुण सहा आरोपी व एक अल्पवयीन असे एकुण सात जण पोलिसांनी ताब्यात घेतले असून अजून पाच आरोपी अटक करण्याचे काम वेगाने सुरु आहे. त्यांना देखील लवकरच ताब्यात घेतले जाणार असल्याचे म्हटले जात आहे. लुट करण्यात आलेले अमित अग्रवाल यांच्याकडे यापुर्वी कामाला असलेला तेज संतोष इंगळे हा या कटाचा सुत्रधार असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानेच टीप दिल्यामुळे हा लुटीचा प्रकार घडला. कंपनी मालक अग्रवाल हे दररोज रात्री १५ ते २० लाख रुपये नेतात अशी टीप तेज इंगळे याने त्याच्या साथीदारांना दिली होती. त्यानुसार कट व सापळा रचून हा गुन्हा करण्यात आल्याचे उघडकीस आले आहे. सदर गुन्हा उघडकीस आणल्याबद्दल पोलीस अधिक्षक डॉ. प्रविण मुंढे यांनी एमआयडीसी पोलीसांचे अभिनंदन केले आहे. रात्रीच्या वेळी रोख रक्कम नेतांना सावधानता बाळगण्याचे आवाहन त्यांनी जनतेला या माध्यमातून केले आहे. अटकेतील आरोपींना न्या. जे. एस. केळकर यांच्या समक्ष हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना २५ ऑगस्ट पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. सरकारपक्षातर्फे अॅड. स्वाती निकम यांनी न्यायालयीन कामकाज पाहिले. या गुन्हयाचा पुढील तपास स.पो.नि. अमोल मोरे व त्यांचे सहकारी पोहेकॉ रतीलाल पवार करत आहेत.

## कर्जबाजारी किरणचा प्लान ...

पिण्याचे वांदे देखील झाले होते. तुंग हे सांगली कराड हायवेवरील गाव या ठिकाणी विश्रांती नावाचे हायवे वर चहाचे हॉटेल आहे या ठिकाणी माणीकराव पाटील हे चहा पिण्यासाठी येत होते.त्याच ठिकाणी किरण रणदिवे हा ही बऱ्याचवेळेला काम धंदा नसताना येऊन थांबत होता. त्याची नजर माणीकराव पाटील याच्यावर पडली होती.माणीकराव पाटील हे तुंग या ठिकाणी एकाचे बांधकाम करीत होते. त्यामुळे ते सांगलीहून तुंग येथे नेहमी ये जा असायची.विश्रांती चहा टपरीवर चहा घेऊन ते कामाच्या ठिकाणी जात होते. पाटील याच्या पाकिटात कायम पैसे भरलेले असायचे हे रणदिवे याने पाहिले होते.एकदा दोनदा त्याने चहा टपरीवर गोड बोलून त्याचेशी ओळक काढून त्याचां संपर्क नंबर घेतला होता. पाटील यांना त्याने खोटेच आपले दोन प्लॅट आहेत आणि ते डेव्हलप करायचे आहेत असे सांगितले होते. पाटील यांनी ही आपण ते डेव्हलप करून देतो असे त्याला सांगितले. परंतु त्यांना त्याची खरी परिस्थीती माहित नव्हती. रणदिवे याच्या डोक्यात मात्र वेगळाच विचार चालू होता.पाटील याच्याकडील पैसे पाहून त्याची मती फिरली होती. आपण कर्जबाजारी आहोत आपले कर्ज फेडण्यासाठी पाटील याचे अपहरण करून त्याच्या कुटुंबाकडून खंडणी उकळायची असा त्याच प्लॅन होता. त्याने आपला प्लॅन आपले मित्र अनिकेत उर्फ निलेश दुधारकर आणि अभिजीत कणसे यांना सांगितली. ते दोघे ही कर्जबाजारी होते, त्यांना ही पैशाची गरज होती. म्हणून त्या दोघांनी ही रणदिवे याच्या प्लॅनला संमती दिली. आता त्या तिघांनी मिळुन पाटील याचे खंडणीसाठी अपहरण करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी एक प्लॅन केला. त्याच्या ठरलेल्या प्लननुसार रणदिवे याने दि.१० ऑगस्टपासून पाटील यांच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. तो पाटील यांना फोन करून आपले तुंग येथील प्लॅट पाहण्यास या असे सांगू लागला. परंतू पाटील याचेकडे काम भरपुर असल्याने त्याना रणदिवे याच्याकडे जाण्यास सवड मिळत नव्हती.तो सारखा फोन करीत असल्याने ते त्याला मी येतो असे सांगत होते. दि.१३ ऑगस्ट रोजी ते संध्याकाळी आपली कार घेऊन घरातून बाहेर पडले. ते तुंग येथे आले. ते हायवेवर नेहमीप्रमाणे त्यावेळी रात्रीचे ८.३० वाजले होते.रणदिवे याने माणीकराव पाटील यांना मिणचे फाटयाजवळ या असे सांगितले. पाटील हे तेथे गेल्यावर त्यांनी रस्त्याकडेला आपली कार थांबविली. रात्रीच्या अंधारात रणदिवे आणि त्याचे साथीदार हे पाटील याच्या कारमध्ये येवून बसले. पुढे कुंभोज रस्त्याला आपले प्लॅट आहेत तिकडे कार घ्या असे त्यांनी त्याना सांगितले. म्हणून पाटील हे कार चालू करून तिकडे चालले असता तुंग गावाच्या बाहेर त्यांनी कार थांबविण्यास सांगितले. त्यावेळी रणदिव, कणसे आणि दुधारकर यांनी पाटील यांना कारमध्येच मारहाण करायला सुरूवात केली. अचानक त्यांनी मारहाण करायला सुरूवात केल्यावर पाटील हे ओरडायला लागले. तेथून जवळच मारूती मंदिर असल्याने व त्या दिवशी शनिवार असल्याने मारूती दर्शनासाठी भाविकांची गर्दी ही होती. पाटील हे ओरडत असताना लोक कारच्या दिशेन येतील म्हणून त्या तिघांनी कारच्या काचा लावून घेतल्या. पाटील यांना बेशुध्द होईपर्यत मारहाण केली. त्यातच रणदिवे याने त्याचा गळा आणि तोंड दाबून धरले. त्याचा श्वास गुदमरल्याने ते लगेच बेशुध्द पडले. त्या अवस्थेत त्या तिघांनी त्यांना त्याच्याच कारच्या डिग्गीत टाकले.त्याची हालचाल मंदावली होती. ते तिघे ही घाबरून गेले. करायला गेले एक आणि झाले दुसरेच होते. पाटील हे त्यांनी केलेल्या मारहाणीत जिंवत राहिले नाहीत हे त्यांना समजताच त्याची पाचावर धारण बसली. आता काय करायचे याचा विचार करून त्यांनी त्याच्या मृतदेहाची विल्हेवाट लावायचे ठरविले. ती कार कणसे याने चालू केली. पाठीमागे रणदिवे आणि दुधारकर बसले. कवठेपिराण, दुधगाव मार्गे कोल्हापूर जिल्हयातील कुंभोज येथील वारणा नदीजवळ आले. तेथे त्यांनी पुलावर कार लावून पाटील याचा मृतदेह डिग्गीतून बाहेर काढला. त्याचे दोन्ही हात पाय आपल्या कडील दोरीने बांधले आणि पुलावरून त्याचा मृतदेह वारणा नदीत टाकला. परत ती कार घेऊन ते कुंभोज हून हातकणंगले, इचलकरंजी मार्ग कोल्हापूर सांगली हायवेने कोडिंग्रे फाटयाजवळ येऊन तेथे त्यांनी रस्त्याकडेला ती कार लावली आणि तेथून त्यांनी खाजगी वाहनाने सांगली मार्गे कवठेपिराण गाठले. इकडे माणीकराव पाटील हे १३ ऑगस्ट रोजी संध्याकाळी घराबाहेर पडले ते दोन तीन दिवस झाले तरी घरी आले नसल्याने आणि त्याचा मोबाईल ही बंद लागत असल्याने त्यांची पत्नी आणि मुलगा चिंतेत होते. त्यांनी त्याचा सगळीकडे शाषध घेतला. परंतु त्याचा शोध लागला नसल्याने पाटील याचा मुलगा विक्रमसिंह पाटील याने आपले वडिल माणीकराव पाटील हे दि. १३ ऑगस्टपासून बेपत्ता असल्याची फिर्याद सांगली ग्रामीण पोलीसात दाखल केली. पोलीस त्याचा शोध घेत असताना दि.१६ ऑगस्ट रोजी त्याचा मृतदेह कवठेपिराण जवळील वारणा नदीच्या पात्रात मिळून आला. त्याचे दोन्ही हात दोरीने घट्ट बांधलेले होते. दोरीचा एक तुकडा पाठीला ही बांधलेला होता. सांगली ग्रामीण पोलीसांनी घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सांगली सिव्हिल हॉस्पिटल मध्ये पाठवून दिला. त्याचवेळी पाटील याची कार इचलकरंजीजवळील कोडिंग्रे फाटावर मिळून आल्याने त्याचा खून कुणी आणि कशासाठी केला याचा पोलीस तपास करीत असताना तुंग फाटयावर पाटील हे दि.१३ ऑगस्ट रोजी आपल्या कारमध्ये बसले असल्याचे दिसत सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत होते. त्याचबरोबर त्या कारमध्ये आणखी दोघे तिघे ही बसत असताना ही दिसत होते. पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी सीसीठीव्ही फुटेज आणि मयत पाटील याच्या मोबाईल कॉलचे रेकॉडींग तपासत असताना घटनेच्या दिवशी व त्या अगोदर दोन चार दिवस एकाच व्यक्तीचा एकाच नंबरवरून कॉल आल्याचे दिसून येत होते. गेल्या आठ दहा दिवस पोलीस या घटनेचा तपास करीत असताना तो फोन नंबर कवठेपिराण येथील किरण रणदिवे याचा असल्याचे निष्पन्न झाले. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो कवठेपिराण येथून पसार झाल्याचे पोलीसांना समजले. या घटनेचा तपास सांगली ग्रामीण पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे अन्वेषणाचे पोलीस ही करीत होते. संशयीत आरोपीच्या मागावर पोलीसांनी आपले खबरे ही लावले होते. गेल्या १५ दिवस पोलीस संशयीत आरोपीचा शोध घेत होते. अखेर दि.३० ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे अन्वेषणाच्या पथकाला किरण रणदिवे,निलेश दुधारकर,अभिजीत कणसे हे तिघे ही वाळव्या जवळील कारंदवाडी येथील रणदिवे त्याच्या घरीच सापडले. गुन्हा करून जणु काही घडले नसल्याच्या अविर्भावात ते कारंदवाडी येथे राहत होते. पोलीसांनी त्यांना ताब्यात घेऊन सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे चौकशी केली असता त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची माहिती त्यांनी पोलीसांना दिली. मयत माणीकराव पाटील याच्या मुलगा विक्रमसिंह पाटील याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी माणीकराव विठ्ठल पाटील(वय५५) याचे अपहरण करून त्याचा खून करून पुरावा नष्ट केल्याप्रकरणी किरण लखण रणदिवे (वय २६) अनिकेत उर्फ निलेश श्रेणीक दुधारकर (वय २२) आणि अभिजीत चंद्रकांत कणसे (वय २३) रा.तिघे ही कारंदवाडी ता.वाळवा याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२, २०१प्रमाणे गुन्हा नोंद केला. पोलीसांनी या तिघांना मा. कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती.या घटनेचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पो.निरी.सतीश शिंदे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो.निरी.शिवाजी गायकवाड, उप.निरी.सागर पाटील, हवा.बिरोबा नरळे, व्रिकम खोत, संदीप गुरव, निलेश कदम, अरूण औताडे, मेघराज रुपनर, आर्यन देशिंगकर, संदीप नलवडे, शशिकांत जाधव, संदीप पाटील यांनी केला. या घटनेचा पुढील तपास सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस करीत आहेत. कर्जबाजारी व्यक्ती शॉट कटने पैसे मिळविण्यासाठी कोणत्या थराला जाते आणि कोणता गुन्हा करून बसते हेच या घटनेवरून दिसून येते.

## दारूच्या पार्टीत त्यांनी हंगामा...

हिललाईन पोलिसांनी मृतदेहाच्या हातावर दीपक नावाचे टॅटू काढला होता. नावाच्या टॅटूवरून तपास केल्यावर मृताचे नाव दीपक भट आहे.दिनांक २४/०८/२०२२ रोजी दसरा मैदान उल्हासनगर ५ जवळील नाल्यामध्ये एक इसमाचे प्रेत कुजलेल्या अवस्थेत मिळुन आल्याने सदर प्रकरणी हिललाईन पोलीस स्टेशन अकस्मात मृत्यु रजि. नं. ५२/२०२२ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे दाखल करण्यात येवुन सदर अकस्मात मृत्युचा तपास पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. करडकर हे करत होते.मृतदेहाचा चेहऱ्यावरील संपुर्ण त्वचा कुजलेली असल्याने मृतदेहाची ओळख पटवणे तसेच मृत्यूचे कारण समजणे पोलीसांसाठी आव्हान होते. मृतदेहाचे उजव्या हातावर इंग्रजीत दीपक असे नाव गोंदलेले दिसुन आले. त्यावरून मृतदेहाची ओळख पटविणेसाठी स्वतंत्र पोलीस पथके नेमण्यात आली होती.मयत व्यक्ती हा दिपक भट नावाचा नेपाली इसम असुन तो गायकवाड पाडा, उल्हासनगर ५ येथील सनी चायनीजवालाचे दुकानात चायनीज बनविण्याचे काम करत असल्याची माहिती प्राप्त झाली. सदर मिळालेल्या माहितीवरून मयत इसम हा काम करीत असलेले ठिकाण शोधुन त्याचे नातेवाईक टिका सुकदेव भट, वय ५० वर्षे, राह. बदलापुर यांचा शोध घेतला व त्यांना मयताचे उजव्या हातावर इंग्रजीत दीपक गोंदलला फोटो दाखविला असता त्यांनी ते पाहुन मयताचे नाव दिपक राजेंद्र भट, वय २१ वर्षे, मुळ राह. मु. हुलकुटा, पो. अजयमिरू, गावपालिका, तहसिल चार, जिल्हा डडेलधुरा, आचलमहाकाली, नेपाळ असे असल्याचे निष्पन्न झाले. मयताचे प्राप्त माहितीच्या अनुषंगाने अधिक तपास केला असता मयत दिपक भट व त्याचे सोबतचे त्याचे मुळ गावाकडील इतर चार साथीदार यांच्यात दारू पिवुन वाद झाल्याने त्यापैकी कालु उर्फ दिनेश उर्फ कृष्णा उर्फ किशन थापा, समीर थापा याने मयत इसम दिपक यास दिनांक १७/०८/२०२२ रोजी फावड्याच्या दांडक्याने डोक्याचे मागे, पाठीवर मारहाण करून लाकडाचा ठोकळा मयत इसम दिपक भट याच्या कपाळावर व चेहऱ्यावर मारून त्यास जागीच जीवेठार मारून त्याचा मृतदेह दसरा मैदान जवळील नाल्यात फेकुन दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.त्याबाबत हिललाईन पोलीस स्टेशन येथे दिनांक २८/०८/२०२२ रोजी गुन्हा रजि. नं.३२२/२०२२ भा.दं.वि.क. ३०२,२०१, ५०४,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन गुन्हयातील आरोपी कालु उर्फ दिनेश उर्फ कृष्णा उर्फ किशन थापा याचा शोध घेवुन त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपी समीर थापा याचा शोध पोलीस घेत आहेत. सदरची उत्कृष्ठ कामगिरी ही वरीष्ठ पोलीस निरीक्षक आर. एस. डेरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) करडकर, सह पोलिसांनी केली.

## बचत गटांना मिनी ट्रॅक्टरसाठी ९० टक्के अनुदान

पालघर : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर कल्टिव्हेटर किवा रोटॅव्हेटर व ट्रेलर खरेदी करण्यासाठी DBT (Direct Benefit Transfer) तत्वावर ९० टक्के अनुदान (कमाल रक्कम रू.३.१५ लाख च्या मर्यादित) देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागामार्फत राबविली जात आहे. सदर या योजनेचा लाभ घेण्याकरिता पालघर जिल्ह्यातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील बचत गटांनी आपले प्रस्ताव / अर्ज सहायक आयुक्त, समाज कल्याण, पालघर यांचे कार्यालयात सादर करावेत. या योजनेच्या संबंधी अधिक माहिती करिता जिल्हा मुख्यालय, प्रशासकीय इमारत- अ तळ मजला रूम नं. ००१, पालघर बोईसर रोड कोळगांव ता. जि. पालघर येथील कार्यालयाशी व दूरध्वनी क्रमांक ०२५२५-२५४२७७ नंबरवर संपर्क साधून जास्तीत जास्त बचत गटातील लाभर्थ्यानी या योजनेचालाभ घ्यावा. असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, यांनी केले आहे.

# गणेश भक्तांनी तलावात गणपती मुर्तीचे विसर्जन न करता पाण्याने भरलेल्या दगड खाणीत मुर्तीचे विसर्जन करावे -पोनि नामदेव शिंदे



**सोलापूर/प्रतिनिधी**

हिप्परगा तलावातील पिण्याच्या पाण्याचे संवर्धन व्हावे यासाठी गणेश भक्तांनी तलावात गणपती मुर्तीचे विसर्जन न करता जवळच्याच पाण्याने भरलेल्या दगड खाणीत गणपती मुर्तीचे विसर्जन करावे अशी मागणी हिप्परगा ग्रामस्थांकडून करण्यात आली त्यावरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी हिप्परगा तलावाची आणि खाणीची पाहणी केली आणि गणेश भक्तांनी तलावात गणपती मुर्ती विसर्जन करू नये असे आवाहन पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी केले. दरम्यान मुर्ती तलावात विसर्जन करण्यास प्रतिबंध करावा अशा मागणीचे निवेदन हिप्परगा ग्रामपंचायतीकडून पोलीस निरीक्षक शिंदे यांना देण्यात आले. प्रत्येक सजीव पशु, पक्षी, आणि मानवाला पाण्याची आवश्यकता आहे. पाणी हे जीवन आहे. यापुढील काळात पाण्यावरून महायुध्द होवू शकते असे भाकीतही काही तज्ज्ञांनी केले आहे. म्हणून निसर्गाने दिलेले हे पाणी आपण प्रत्येकाने जपून वापरले पाहिजे. यंदा गणरायाच्या आशिर्वादाने चांगला पाऊस झाला आहे सर्वच जलस्त्रोत भरलेले आहेत त्याप्रमाणे सोलापूर शहर, दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तालुका, अक्कलकोट तालुनयातील काही गावांच्या पिण्याचा तसेच शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवणारा हिप्परगा तलाव तुडुंब भरला आहे या तलावातील पाण्याचे संवर्धन केले पाहिजे म्हणूनच गणेश मुर्ती विसर्जन करताना नागरीक भाविक भक्तांनी हिप्परगा तलावात गणपती मुर्तीचे विसर्जन न करता शहराच्या लगत असलेल्या अनेक खाणी आहेत त्या बंद पडलेल्या आहेत त्यामध्ये मोठ्याप्रमाणात पाण्याचा साठा निर्माण झाला आहे. त्या खाणीतच गणपती मुर्तीचे विसर्जन करावे. जेणेकरून हिप्परगा तलावात गाळ होणार नाही आणि पाण्याची क्षमता टिकून राहील आणि नागरीकांच्या पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यास मदत होईल. हिप्परगा तलावात गणेश मुर्ती विसर्जन झाल्याने माती वाढेल, मुर्ती वरील रंग पाण्यात मिसळून पाणी गढूळ होवून प्रदुषित होणार आहे त्यामुळे पशु पक्ष्यासह मानवाच्या आरोग्यालाही धोका निर्माण होणार आहे. त्यामुळे गणेश मुर्ती विसर्जन हिप्परगा तलावात न करता बंद पडलेल्या खाणीत करावे असे आवाहन सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नामदेव शिंदे यांनी केले. त्यादृष्टीने त्यांनी हिप्परगा तलाव तसेच शहराच्या सीमेवर असलेल्या सोलापूर तुळजापूर रस्त्यावरील बंद पडलेल्या आणि पाण्याने भरलेल्या खाणीची पाहणी केली.

### तलावात विसर्जन नको; हिप्परगा ग्रामपंचायतीकडून निवेदन

हिप्परगा तलाव हा ऐतिहासिक आहे आणि सध्या त्यामध्ये मोठ्याप्रमाणात पाण्याचा साठा आहे. तलावात गणपती विसर्जन करून तलावातील पाणी प्रदुषित करू नये सोलापूर शहर आणि ग्रामीण पोलीस, सोलापूर महानगर पालिका आणि जिल्हाधिकारी यांनी लक्ष देवून हिप्परगा तलावात गणपती मुर्ती विसर्जन करण्यास प्रतिबंध करावा अशा मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी, पोलीस प्रशासनाला देण्यात आले. यावेळी सरपंच गुरलिंग धुमाळ, ग्रामपंचायत सदस्य विशाल कांबळे, तंटामुक्त अध्यक्ष रियाज पटेल, बाळकृष्ण जाधव आदीं उपस्थित होते.

# ५३ महाराष्ट्र बटालियन, एन.सी.सी.लातूर करणार लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील शहिदांच्या कुटुंबियांचा गौरव!

## आज महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सभागृहात होणार गौरव समारंभ

**लातूर/प्रतिनिधी**

५३ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी, लातूर आणि महात्मा बसवेश्वर महाविद्यालय (अमृत महोत्सव समिती व राष्ट्रीय छात्र सेना), लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि.०५ सप्टेंबर २०२२ रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये स.११वा. शहीदो को शत शत नमन या उपक्रमाद्वारे उस्मानाबाद आणि लातूर जिल्ह्यातील वीरता पदक पुरस्काराने शहिदांच्या कुटुंबियांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला आहे. या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे यांची उपस्थिती लाभणार असून प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्रातील प्रसिद्ध विचारवंत तथा इतिहासकार प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे, प्रमुख अतिथी म्हणून ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरचे लेफ्टनंट कर्नल संतोष कुमार, कॅप्टन दीपक कुमार, कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले आणि अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत गायकवाड यांची उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमांमध्ये देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्र मोदी यांच्या स्वाक्षरीसह असलेले स्मृतीचिन्ह, शाल आणि पुष्पगुच्छ देऊन शहीद जवानांच्या कुटुंबीयांना सन्मानित करण्यात येणार आहे. राष्ट्रासाठी शहीद झालेल्या व्यक्तींचे स्मरण करणे आणि समाजातील युवा पिढींना शहिदांच्या बलिदानाची आठवण करून देऊन त्यांच्यामध्ये प्रेरणा निर्माण करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या




कार्यक्रमाला ५३ महाराष्ट्र बटालियन, एनसीसी, लातूरचे सर्व अधिकारी, लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व एनसीसी ऑफिसर, एनसीसी कॅडेट्स यांची उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमाला लातूर व उस्मानाबाद जिल्ह्यातील सर्व मान्यवर, आजी-माजी सैनिक व त्यांचे कुटुंबीय आणि एनसीसी कॅडेटने उपस्थित राहण्याचे आवाहन ५३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूरचे लेफ्टनंट कर्नल संतोष कुमार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, नायब सेबेदार दीलिप शेंडगे, संयोजन समिती सदस्य डॉ.श्रीकांत गायकवाड, कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले, डॉ.रत्नाकर बेडगे आणि डॉ.संजय गवई यांनी केले आहे.

# पत्रकाराच्या अंत्यसंस्कारासाठी मानवंदना देण्याची देवणी तालुका मास संघटनेची मागणी



**देवणी/प्रतिनिधी**

पत्रकारांच्या अंत्यसंस्कारासाठी शासकीय मानवंदना देण्यात यावी या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांचे निवेदन मातंग अस्मिता संघर्ष सेनेच्या वतीने सोमवार दि.२९ ऑगस्ट रोजी देवणी तहसीलदार मार्फत राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, देवणी तालुक्यातील गायराण धारकांच्या नावे पट्टे करूण देण्यात यावे. बांधकाम कामगारांना ग्रामसेवकांचे ९० दिवसाचे बांधकाम प्रमाणपत्र देण्यास यावे. पत्रकारांच्या अंत्यसंस्कार करण्यासाठी शासकीय मानवंदना देण्यात यावी. शेतकऱ्यांना खरीप पीक विमा मंजूर करण्यात यावा. मंजुर शेतमजूर बाधकाम कामगारांना प्रतीमहीना ५ हजार रुपये मानधन देण्यात यावे. उपेक्षित कलावंताना मानधन देण्यात यावे, संजय गांधी, वृध्द, अपंग, श्रावणबाळ योजनेसाठी एक्केवीस हजाराचे प्रमाणपत्र रद्द करणे व या लाभार्थीना मासीक अनुदान पाच हजार देण्यात यावे. साहित्य रत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे व वस्ताद लहुजी साळवे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावे, यासह आदी मागण्या दिलेल्या निवेदनातून केल्या आहेत. निवेदनावर मातंग अस्मिता संघर्ष सेनेचे देवणी तालुकाध्यक्ष जितेशभाई रणदिवे, हुशेन धोत्रे, गोविंद दंडे, लक्ष्मण रणदिवे, सतिष कांबळे, यांच्यासह आदींच्या स्वक्षऱ्या आहेत.

# पालघर जिल्ह्यात १ ते ७ सप्टेंबर जिल्ह्यात 'मातृ वंदना सप्ताह'

**पालघर/प्रतिनिधी**

दि.०१ सप्टेंबर ते ०७ सप्टेंबर २०२२ या कालावधीत मातृ वंदना सप्ताह देश भरात साजरा करण्यात येत असून प्रधानमंत्री मातृ वंदना योजना बाबत जनजागृती करणे तसेच या अंतर्गत पात्र लाभार्थी नोंदणीस गती देणे हा या मागिल उद्देश आहे. बँक किंवा पोस्ट बँक खाते व आधारकार्ड यांची पुर्तता करून पहिल्या खेपेच्या सर्व मातांनी या योजनेचा लाभ घ्यावा तसेच गरोदरपणात योग्य आहार व पुरेशी विश्रांती याकडे विशेष लक्ष द्यावे असे आवाहन या निमित्ताने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर, सिद्धाराम सालीमठ आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. दयानंद सुर्यवंशीयांनी केले आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेच्या लाभाकरीता आवश्यक निकष व कागदपत्रांची पूर्तता करून याचा लाभ घ्यावा असे देखील त्यांनी म्हटले आहे.प्रसुतीच्या अगोदर आणि प्रसुतीनंतर पहिल्या जिवंत अपत्याकरीता विश्रांती बुडीत मजुरीचा लाभ घ्यावा तसेच स्तनदा मातेचे आरोग्य निरोगी राहावे तिची शारीरिक झीज भरून निघावी व बाळाला स्तनपान करता करता यावे या मुख्य उद्देशाने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना जानेवारी २०१७ पासून राबविली जात आहे. सदर योजने अंतर्गत लाभार्थी केवळ कुटुंबातील पहिल्या जिवंत मुलासाठी योजने अंतर्गत लाभाचा दावा करण्यास पात्र आहे. या योजनेत मातांना तीन टप्यात ५,०००/- रुपयांचा लाभ देण्यात येतो. गरोदरपणाची शासकीय



आरोग्य संस्थेत दिवसाच्या आत नाव नोंदणी केल्यावर रक्कम रु. १,०००/- चा पहिला हप्ता देण्यात येतो. किमान एकदा प्रसूतीपूर्व तपासणी केल्यास गर्भधारणेचे सहा महिने पुर्ण झाल्यानंतर रु. २०००/- चा दुसरा हप्ता बँक खात्यात जमा होतो. तर प्रसूतीनंतर बाळाची जन्मनोंदणी व महिन्याचे प्राथमिक लसीकरण पूर्ण केल्यानंतर रु २०००/-चा दुसरा हप्ता देण्यात येतो. वरील रक्कमेचा लाभ व लाभार्थीला मिळणाऱ्या लाभाची रक्कम राज्यस्तरावरून लाभार्थीच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये किंवा पोस्ट बँक खात्यामध्ये तीन हप्त्यात (Direct Beneficiary Transfer) द्वारे थेट जमा केली जाते. पालघर जिल्हयासाठी राज्यस्तरावर जानेवारी २०१७ ते मार्च २०२३ पर्यत एकूण ८६,४३९ मात्र लाभार्थी नोंदणीचे उद्दि देण्यात आले असुन आजतागायात ८६,६४१ लाभार्थीची नोंदणी पूर्ण करून १००% उद्दिष्ट साध्य करणात आले आहे. तसेच ७४,४३८ लाभार्थीच्या खात्यावर ३३ कोटी ६९ लाख ३५ हजार रुपयाचा निधी वर्ग करण्यात आला आहे. तरी योजनेस पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य संस्थेमध्ये किंवा रुग्णालयात जाऊन नोंद करून घ्यावी. व योजनेविषयी अधिक माहितीसाठी आशा, आरोग्य सेविका व कोणत्याही शासकीय आरोग्य संस्थेशी संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने केले आहे.

# हडोळती येथील वेश्या व्यवसायावर पोलिसांची धाड; तीन महिलेसह एका इसमास अटक!

**अहमदपूर/फिरोज शेख**

अहमदपूर तालुक्यातील हाडोळती येथील बाभळदरा रोड लगतच्या दोन मजली घरात वेश्याव्यवसाय चालत असल्याच्या गुप्त माहितीच्या आधारावर पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात तीन महिला व एकाला ताब्यात घेण्यात आले.



याविषयी सविस्तर वृत्त असे की, अहमदपूर येथील पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांना गुप्त माहितीच्या आधारे हडोळती येथील बाभळदरा रोड लगत दोन मजली घरात वेश्या व्यवसाय चालत असल्याची माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे त्यांनी तक्रारदार पुंडलिक हाणमंतराव केंद्रे (वय ४५) पो.ह.पोलीस स्टेशन अहमदपूर, प्रशिक्षणार्थी मपोउपनि चट, मपोका कोठेवाढ, पोना केंद्रे, चापोका आरदवाड यांना सोबत घेऊन हडोळती गाठली.तत्पुर्वी त्यांनी हडोळती येथील पोलीस चौकीतील पोका केंद्रे व धुळगुंडे यांना या घटनेची सविस्तर माहिती देत एक बनावट ग्राहक तयार ठेवण्याचे आदेश दिले. हडोळतीत आल्यानंतर त्यांनी बनावट ग्राहकास सविस्तर माहिती देऊन सदरील ठिकाणी पाठवले. सदर ठिकाणी बनावट ग्राहकाने तेथे उपस्थित एका ईसमास शरीर सुखासाठी महिलेची मागणी केली असता त्यांना सूल्याबाई उत्तम चव्हाण (वय ५०),हिना आमजद मिर्झा (वय ३५) व सिमा प्रेमकुमार शर्मा (वय ३५) या महिला दाखवण्यात आल्या. ठरल्याप्रकारे बनावट ग्राहकाने मिसकॉल देऊन ही माहिती पो.नि.कामठेवाड यांना कळवली. नंतर कामठेवाड यांनी आपल्या साथीदारांसह कमलबाई माधव राजपंगे यांच्या घरी छापा टाकला. या छाप्यात त्यांनी वेशाव्यवसाय करणाऱ्या तीन महिलेसह एका इसमास ताब्यात घेऊन २१०० रु.चा मुद्देमाल जप्त केला.सदर आरोपीवर गुन्हा नोंद करण्यात आला. दरम्यान अहमदपूर येथील पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी आपल्या पोलीस कर्मचाऱ्यांसह हडोळती येथील पोलीस चौकीत कार्यरत असलेल्या पोलीस सहकाऱ्यांना एक बनावट ग्राहक तयार ठेवण्याचे आदेश दिले. हडोळतीत आल्यानंतर पो.नि. कामठेवाड यांनी बनावट ग्राहकास संपुर्ण माहिती देत ५०० रुपयांची नोट दिली व त्यावर पंचाच्या सह्या घेऊन बनावट ग्राहकास सदर ठिकाणी पाठवले. त्यानंतर सदरील ठिकाणी गेले तेथे उपस्थित एका ईसमास शरीर सुखासाठी महिलेची मागणी केली.यावेळी ५०० रु.दर ठरविण्यात आला. तेंव्हा बनावट ग्राहकाने जवळील ५०० रु.ची नोट त्या ईसमास दिली.तेंव्हा त्या ईसमाने वेशा व्यवसाय करणाऱ्या तीन महिला दाखवून त्यातील एकाची निवड करण्यास सांगितले.तेंव्हा ठरल्याप्रमाणे बनावट ग्राहकाने पोना केंद्रे यांच्या मोबाईलवर मिसकॉल करत ईशारा दिला.तेंव्हा पोलीस निरीक्षक कामठेवाड यांच्यासह साथीदाराने बाभळदरा रोड लगत असलेल्या कमलबाई माधव राजपंगे यांच्या दोन मजली घरी छापा टाकला असता त्यांना तळमजल्यावरील घरातील एका रुममध्ये पलंगाखाली लपवून ठेवलेल्या तीन महिला आढळल्या व बनावट ग्राहका जवळ पो.नि. कामठेवाड, दोन पंचाच्या सह्या असलेली ५०० रु.ची नोट सदर ईसमाजवळ आढळून आली.

# जिल्ह्यात जनावरांमधील लम्पी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता सतर्कता बाळगावी!

**पालघर/प्रतिनिधी**

गुजरात राज्यातील पशुधनामध्ये लम्पी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव आढळून आलेला आहे. गुजरात राज्याची सीमा पालघर जिल्ह्याला लागून असल्यामुळे सदर रोगाचा प्रादुर्भाव पालघर जिल्ह्यातील पशुधनामध्ये होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लम्पी त्वचा रोग जनावरातील विषाणूजन्य आजार आहे. लम्पी त्वचा रोगामध्ये जनावरास तीव्र स्वरूपाचा ताप येतो. डोके, मान, पाय छाती पाठ, कास इ. भागावरील त्वचेवर १ ते ५ से.मी. व्यासाच्या गाठी येतात. पायावर सूज आल्याने जनावर लंगडते. जनावराची भूक व तहान मंदावत जाते व दुध उत्पादन कमी होते. सदरील रोगाचा प्रसार माश्या, गोचीड यांच्या मार्फत एका जनावाराकडून दुसऱ्या जनावरांना होतो. प्राण्यांमधील संक्रमक व सांसर्गिक रोगप्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ अन्वये कलम ४ मधील तरतुदीनुसार प्रत्येक पशुपालक किंवा इतर कोणतीही व्यक्ती, अशासकीय संस्था, सार्वजनिक संस्था किंवा ग्रामपंचायत, कोणत्याही प्राण्याचा प्रभारी यांना पशुधनामध्ये लम्पी त्वचा रोगाची लागण झाली



आहे असे निदर्शनास आल्यास त्यांनी ग्रामविकास अधिकाऱ्याला वस्तुस्थिती कळवावी. व ग्रामपंचायत प्रभारी यांनी जवळच्या उपलब्ध पशुवैद्यकांना लेखी कळविण्यात यावे.

सर्व पशुपालकांना कळविण्यात येते की जनावरांचा गोठा स्वच्छ ठेवण्यात यावा. जनावरांवरील माश्या व गोचीड निर्मुलन करण्यात यावे त्याकरिता कीटक नाशकांचा जनावारंवर, गोठ्यात व परिसरात वापर करण्यात यावा. पालघर जिल्ह्यातील पशुधनामध्ये लम्पी त्वचा रोगाकरिता प्रतिबंधक उपाययोजना म्हणुन सतर्कता बाळगण्यात यावी. असे आवाहन, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत कांबळे यांनी केले आहे.

### ६ सप्टेंबर रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

पालघर : जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याच्या पहिल्या सोमवारी करण्यात येते. त्या अनुषंगाने या महिन्यातील सप्टेंबर २०२२ चा जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार, दि. ५ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला होता परंतु सदर दिवशी ज्येष्ठगौरी विर्सजनाची सार्वजनिक सुट्टी असल्याने त्यानंतर येणाऱ्या दिवशी म्हणजेच मंगळवार दिनांक ६ सप्टेंबर २०२२ दुपारी १:०० वाजता जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेला आहे. तरी अर्ज केलेल्या नागरिकांनी सदर बैठकीस आवश्यक त्या माहितीसह प्रत्यक्ष वरील दिनांकास व वेळेवरउपस्थित रहावे.

# महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना

**लातूर/करकरे अंबादास**

लातूर जिल्ह्यातील सर्व शेतकरी यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय दिनांक २९ जुलै २०२२ अन्वये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत अल्पमुदत पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजारांपर्यत प्रोत्साहनपर लाभ देण्याच्या योजनेस मान्यता दिलेली आहे. नियमित कर्जपरतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी सन २०१७-१८, २०१८-१९ आणि २०१९-२० हा कालावधी विचारात घेण्यात येणार असुन या तीन आर्थिक वर्षापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येणार आहे. सदर योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. योजना पुर्णत: ऑनलाईन पध्दतीने राबविली जाणार असून आधार क्रमांकानुसार यादया तयार करुन त्याचे लेखापरिक्षण करून घेणार आहे. या लेखापरिक्षण झालेल्या यादया महा-आयटीमार्फत विकसीत संगणकीय प्रणालीवर अपलोड करावयाच्या आहेत. या योजने अंतर्गत ज्या पात्र शेतकऱ्यांची खाती आधार लिंक नसतील अशा शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर दिनांक ०५ सप्टेंबर २०२२ पूर्वी डकवण्यात येणार आहेत. योजनेतंर्गत लाभाची रक्कम शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर वर्ग करण्यात येणार आहे. तरी ज्या शेतकऱ्यांची कर्ज खाती / बचतखाती आधार लिंक नसतील अशा शेतकऱ्यांनी त्यांची खाती आधार लिंक करुन घ्यावीत असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. व जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, लातूर यांनी एका प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

# दर्शन पॉलिटिक्स!

'दुनिया झुकती है मगर झुकानेवाला चाहिए' त्यामुळे संकटाला संधी समजून त्यातून आपली पोळी भाजून घेण्याचा कला ज्या माणसाला अवगत आहे, तोच माणूस या स्पर्धेच्या युगात टिकून राहू शकतो. मोदी म्हणतात ते खरेच आहे. संकट को अवसर समजकर उसका लाभ उठणा चाहिए. त्यानुसार सेनेतील बंडखोरीच्या संकटाचा भाजपने लाभ उठवून महाविकास आघाडीचे सरकार पाडले आणि बंडखोरांना सोबत घेऊन सरकार बनवले. आता शिवसेना काँग्रेस आणि राष्ट्रवादीतील इतर आमदारांवर जाळे टाकले जात आहेत. त्यासाठी गणपतीच्या दर्शनाचा मुहूर्त साधून शिंदे आणि फडणवीस विरोधकांच्या घरी जात आहेत. शिंदेंनी राज पाठोपाठ ठाकरेंचे खासमखास आणि मातोश्री वरचे कारभारी मिलिंद नार्वेकर यांची गणपतीच्या दर्शनाचा निमित्ताने भेट घेतली. त्यापूर्वी भाजपचे आशिष शेलार आणि मोहित कम्बोज यांनीही नार्वेकरांची भेट घेतली. तसेच गणपतीच्या दर्शनाचा निमित्ताने अशोक चव्हाण आणि फडणवीस यांची भेट झाली. हे सर्व दर्शन पॉलिटिक्स असून त्यात श्रद्धा आणि आस्था या पेक्षा पॉलिटिक्स जास्त आहे. म्हणून याला दर्शन पॉलिटिक्स म्हणतात. दोन वर्षांनी यंदा प्रथमच निर्बंधमुक्त गणेशोत्सव साजरा केला जात आहे. त्यामुळे लोकांमधे उत्साह आहे. परिणामी राजकारणी लोकांमध्ये सुद्धा उत्साह आहे. म्हणूनच राजकारणी बाप्पांच्या दर्शनासाठी वेगवेगळ्या गणेशोत्सव मंडळांना तसेच घरगुती गणपतीचे सुद्धा दर्शन घेत आहेत. यात श्रद्धा तर आहेच पण या श्रद्धेबरोबर राजकीय हेतू सुद्धा आहेत. मुंबई महापालिकेची निवडणूक कोणत्याही परिस्थितीत भाजपला जिंकायची आहे. त्यामुळे त्यांना एक मजबूत अशा राजकीय मित्राची आवश्यकता होती. मनसेच्या रूपाने ती मिळत असेल तर पालिका निवडणूक जिंकणे अधिक सोपे जाईल. पण खरोखरच मनसेचा त्यांना फायदा होईल का? किंवा गणेशोत्सवाच्या निमित्ताने जी दर्शन डिप्लोमसी राबवली जात आहे ती फायदेशीर ठरेल का? हे येणारा काळच ठरवेल. पण शिंदेंच्या बंडा मागे भाजप आहे हे आता नक्की झालेय. त्यामुळे बाळासाहेबांवर श्रद्धा असलेला मुंबईतील मराठी माणूस दुखावला गेलाय. त्यामुळे तो या लोकांच्या नादाला लागणार नाही. मुंबईत केवळ २३ टक्के मराठी माणूस आहे जो विविध पक्षामध्ये विभागला गेलाय. शिवाय मनसेची हिंदुत्वाची भूमिका खुद मराठी माणसालाही पटलेली नाही. राहता राहिला प्रश्न परप्रांतीय मतदारांचा तर त्यात निम्मे मुसलमान आहेत ते चुकूनही भाजपला मतदान करणार नाहीत, म्हणूनच भाजपला इतर पक्षांच्या मदतीची गरज आहे. शिंदे गटाकडे मुंबईसाठी एकही चांगला नेते नाही. सदा सरवणकर यांच्यावर त्याच्याच मतदार संघातील लोकांचा राग आहे, तर यामिनी आणि यशवंत जाधव हे जोडपे बेनामी संपत्ती प्रकरणी बदनाम झाले आहे. त्यामुळे पालिका निवडणुकीत त्यांनी पैसे वाटले तरी निवडून येणार नाहीत ही सगळी परिस्थिती आहे. म्हणूनच दर्शन डिप्लोमसीचा आधार घेऊन लोकांच्या जवळ जाण्याचा पर्याय केला जातीय, पण लोक हुशार आहेत ते आता फसणार नाहीत. राजकारणी स्वतःच्या फायद्यासाठी काय करतील याचा नेम नाही. सध्या महाराष्ट्रात गणेशोत्सव सुरू आहे. अशावेळी गणपतीच्या दर्शनाला निमित्ताने कोणाच्याही घरी जाता येते, मग तो मित्र असो की शत्रू असो! हाच एक मोका असतो त्याच्या घरी जाऊन त्याला आपलेसे करण्याचा! त्यामुळे ही दर्शन डिप्लोमसी निश्चितपणे फायदेशीर ठरू शकते. महाराष्ट्रात सध्या भाजप शिंदे गट एकत्र आलेले असले तरी त्यांचे काही खरे नाही. कारण फुटिरांवर महाराष्ट्राचा राग आहे. त्यामुळे आगामी पालिका निवडणुकीत फुटिरांचा काही फायदा होईल असे वाटत नाही. त्यामुळे भाजपचे नेते सध्या राज्य ठाकरेंच्या दरबारात हजेरी लावत आहेत. हनुमान चालीसा प्रकरणात राज ठाकरेंनी हिंदुत्वाची भूमिका घेतली. काय रातोरात ते हीरो झाले आणि भाजपवाल्यांसाठी राज ठाकरेंचे निवस्थान तीर्थक्षेत्र बनले आहे. रोज कुणी ना कुणी भाजप नेता राज ठाकरेंना जाऊन भेटतोय आणि यावेळी तर राज ठाकरेंच्या घरी गणपती आल्याने भेटीसाठी वेगळे कारण देण्याची आवश्यकता नाही. या दर्शन डिप्लोमसीमध्ये मुख्यमंत्र्यांनी तरी का मागे राहावे, म्हणून तेही राज ठाकरेंच्या घरी पोहचले. राज ठाकरेंच्या घरी गणपतीच्या दर्शनाला जाणे ठीक आहे, पण मिलिंद नार्वेकर यांच्या घरी मुख्यमंत्री दर्शनासाठी गेल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. कारण मिलिंद नार्वेकर हे उद्धव ठाकरेंचे निष्ठावान आणि मातोश्री वरचे कारभारी असल्याने त्यांना ठाकरे कुटुंबाची खडान् खडा माहिती. अगदी थोरल्या साहेबांपासून धाकट्या आदित्य पर्यंत सगळ्यांच्या जमाखर्चाचा वह्या नार्वेकर यांच्याकडे! त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी नार्वेकर यांच्या घरी गणपतीच्या दर्शनाला निमित्ताने जाताच अनेकांच्या पोटात भीतीचा गोळा आला. कारण नार्वेकरांनी मातोश्री वरच्या निष्ठा जर शेजारच्या मिठी नदीच्या नाल्यात बुडवल्या तर महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप येण्याची शक्यता आहे.

# पायरसी किंग तमिळ रॉकर्स ते टोरंट




आजच्या इंटरनेटच्या युगात सायबर क्राईम मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. खरेतर, या गुन्ह्यांची सुरुवात इंटरनेटच्या उगमापासूनच झाली आहे. इंटरनेट युगाच्या सुरुवातीच्या काळातील गुन्हा म्हणजे पायरसी होय. पायरसी म्हणजेच एखाद्या मूळ वस्तूची अवैध कॉपी करणे ज्यास चोरी अशेही संबोधले जाते. साधारण १५ वर्षापूर्वी मनोरंजन सर्वासाठी मोफत असावे, काही इंटरनेट सुविधा या नागरिकांसाठी मोफत असाव्यात, सर्व स्तरातील जनतेला याचा फायदा घेता यावा या उद्दीष्टाने तमिळ रॉकर्स या संघटनेचा उदय झाला, यांच्या पायरसीमुळे देश विदेशातील कंपन्या, प्रोड्युसर यांच्या नाकेनऊ आले आहेत. या तमिळ रॉकर्सवर एका ओटीटीवरती वेबसिरीज प्रसिद्ध झाली आहे. तमिळ रॉकर्स असा उल्लेख केल्यामुळे कदाचित तुमच्या लक्षात आले नसेल, पण टोरंट वेबसाईटबद्दल सर्वानाच माहिती आहे. कोणताही सिनेमा, वेबसिरीज, सॉफ्टवेअर, अल्बम आदींची एर्स्ट कॉपी मोफत मिळवण्यासाठी हे सर्वोत्तम ठिकाण मानले जाते. याच तमिळ रॉकर्सनी आपाल्या उद्देश्यपूर्तीसाठी टोरंटची निर्मिती केली.

**कोण होते तमिळरॉकर्स?**

२००७ साली जेव्हा इंटनेटच्या वापराला हळू हळू गती मिळत होती, त्यावेळी प्रभू, कार्थी, सुरेश आणि जॉन्सन या चार मित्रांनी मिळून तमिळ रॉकर्सची स्थापना केली. या टोळीला पायरट बे म्हणून ओळखले जात होते. सुरुवातीला 'तामिळ रॉकर्स' ही एक पायरसी करणारी वेबसाईट होती. पहिल्यांदा केवळ तमिळ चित्रपटांची पायरसी होतहोती, नंतर इतर प्रादेशिक, बॉलिवुड, हॉलिवुड चित्रपटांची पायरसी होऊ लागली. या टोळीसह पायरसीच्या कामात आणखी नेमके किती जण सामील होते याची माहिती अद्याप समोर आलेली नागी. या पायरसीमुळे, त्यांच्या विरोधात तक्रारी वाढल्या आणि या टोळीवर मोठ्या प्रमाणात कारवाया होऊ ळागल्या. नंतर टॉरंटसाईटचा साईटचा जन्म झाला.

**तमिळ रॉकर्स विरोधात पोलीस कारवाई**

२००८ मध्ये केरळ पोलिसांनी तीन जणांना अटक केली, त्यात तमिळ रॉकर्सचा म्होरक्या कार्थी हादेखील होता. याबरोबरच त्याचे दोन सहकारी प्रभू आणि सुरेश यांनाही अटक करण्यात आली होती. पोलिसांकडे बऱ्याच चित्रपट निर्मात्यांनी तक्रार केली होती की त्यांचे चित्रपट हे प्रदर्शन होण्यापूर्वीच किंवा प्रदर्शन झाल्यानंतर १२ तासांच्या आत लगेचच ऑनलाईन माध्यमावर लीक केले जातात. याच काही तक्रारींच्या जोरावर तपास करून पोलिसांनी या गुन्हेगारांना अटक केली. याच ग्रुपने सुपरस्टार मोहनलाल यांचा 'पुलीमुरुगन' हा चित्रपट ऑनलाईन लीक केला होता, तसेच मोहनलाल यांचा मुलगा प्रणव याचा पहिला चित्रपटही याच टोळीने लीक केला असल्याचे त्यावेळेच्या तपासातून समोर आले होते. शिवाय या टोळीने या अवैध मार्गाने एक कोटींपेक्षा जास्त पैसा कामावला असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या टोळीविरोधातील ही आजपर्यंतची सर्वात मोठी कारवाई मानली जाते.

**मोफत मनोरंजन आणि टोरंट**

पोलीस कारवाईनंतर तमिळ रॉकर्स बंद झाले, अशा अनेक बातम्या स्थानिक वृत्तपत्र, वृत्त वाहिनी, वृत्त संस्था यांकडून प्रसारीत झाल्या होत्या. तर, टोरंटद्वारेही तमिळ रॉकर्स बंद झाल्याचे जाहिर केले होते. मात्र टोरंट हे तमिळ रॉकर्सचेच आहे. असे सांगण्यात येत असते. टोरंटवर ही अनेकदा कारवाया होत असतात, वेबसाईट बंद करण्याची वेळही होते. मात्र, टोरंटच्या क्लोन वेसाईट्सद्वारे यांचे कार्य सुरुच असते. समाजातील सर्वच लोक महागडे सॉफ्टवेअर्स विकत घेऊ शकत नाही, तसेच मनोरंजनासाठी पैसे खर्च करावे अशी परिस्थिती नसते. खरेतर मनोरंजन हा सर्वाचा अधिकार आहे. त्यासाठी पैसे मोजावे लागू नयेत, अशा विचारांनी हे तमिळ रॉकर्सने हे पायरसीचे कार्य सुरू केले होते. आज यात अनेक लोक सामील झाले असून इंटरनेटवर पैसे भरावे लागणाऱ्या अनेक गोष्टी मोफत उपलब्ध करून देत आहेत.

**पायरसीचा धोका किती गंभीर आहे?**

करोना काळानंतर एकंदरच मनोरंजनसृष्टीला चांगलाच फटका बसला आहे. त्यात या पायरसीने चांगलीच भर घातली आहे. फक्त चित्रपट किंवा वेबशोजच नव्हे तर वेगवेगळी पुस्तकं, गाणी यांचीसुद्धा पायरसी प्रचंड प्रमाणात वाढली आहे. रशिया आणि अमेरिकेनंतर भारताचा पायरसीमध्ये तिसरा क्रमांक लागतो. यावरून या समस्येचे गांभीर्य आपल्या लक्षात येईल. ओटीटी प्लॅटफॉर्म्सना तर या पायरसीचा सर्वात जास्त धोका आहे. काही रिपोर्ट्सनुसार यावर्षी पायरसीमुळे ओटीटी प्लॅटफॉर्म्सचं जगभरात तब्बल ५२ बिलियन डॉलर्सइतके नुकसान झाले आहे. एवढे होऊनसुद्धा या टॉरंट साईट चालवणाऱ्या लोकांचे म्हणणे आहे की ते या व्यवसायात प्रचंड नुकसान सहन करतात. या पायरसीमधून मिळणाऱ्या पैशातून त्यांच्या साईटचा मेंटेनेंस खर्चसुद्धा फारसा निघत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. आता पायरसी करण्याचा त्यांचा उद्देश्य, पायरसी म्हणजे चोरीच; जो भारतीय कायद्यानुसार गुन्हा आहे. तर दुसरीकडे सिने क्षेत्रातील व्यक्तींचे तसेच सॉफ्टवेअर कंपन्यांचे होणारे नुकसान याबाबत नेमकी कोणती बाजू योग्य आहे, याचा विचार करून लोकांनीच ठरवावे की पायरसी केलेल्या गोष्टींचा वापर करावा की करू नये...

# मराठवाडा मुक्तीसंग्राम अमृत महोत्सवानिमित्त 'द लातूर संस्कृती'तर्फे भव्य निबंध स्पर्धेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्तीसंग्रामाचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरु होत असून या निमीत्ताने द लातूर संस्कृती फाऊंडेशनच्यावतीने जिल्हा व राज्यस्तरावर भव्य निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्याचे अमृतमहोत्सवी वर्ष सुरु आहे व सर्वत्र विविध कार्यक्रमाने हे वर्ष साजरे करण्यात येत आहे. परंतू मराठवाडा १७ सप्टेंबर १९४८ रोजी स्वतंत्र झाला. मराठवाडा मुक्तीसंग्रामाचा इतिहास मोठा आहे. यासाठी अनेकांनी बलिदान दिले आहे. हा इतिहास नव्या पिढीसमोर येणे गरजेचे आहे या उद्देशाने द लातूर संस्कृती फाऊंडेशनच्यावतीने राज्यस्तरावरील निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा तीन गटात होणार आहे. शालेयस्तरावरील निबंधाचा विषय मराठवाडा मुक्तीसंग्राम असा आहे तर महाविद्यालयीन गटासाठी मराठवाडा मुक्तीसंग्रामातील लातूर जिल्ह्याचे योगदान तर खुल्या गटासाठी मराठवाडा मुक्तीसंग्राम हा विषय ठेवण्यात आलेला आहे. राज्यस्तरावर घेतल्या जाणाऱ्या या निबंध स्पर्धेसाठी शालेयस्तरावरील गटासाठी प्रथम रोख रक्कम २१००, द्वितीय १५०० रुपये आणि उत्तेजनार्थ ५०० रुपये, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह. महाविद्यालयीन गटासाठी प्रथम रोख रक्कम ३१००, द्वितीय २१०० रुपये आणि उत्तेजनार्थ ५०० रुपये, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह. खुल्या गटासाठीप्रथम रोख रक्कम २१००, द्वितीय १५०० रुपये आणि उत्तेजनार्थ ५०० रुपये, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह. स्पर्धकांनी आपला स्वहस्ताक्षरामध्ये लिहिलेला निबंध आपल्या विनंतीअर्जासह एका बंद लिफाफ्यामध्ये स्पर्धा संयोजक द लातूर संस्कृती फाऊंडेशन कार्यालय द्वारा हाथवे एमसीएन केबल नेटवर्वे पहिला महिला, आयसीआयसीआय बँक, औसा रोड लातूर. पिनकोड ४१३५१२ येथे तसेच दैनिक सामना कार्यालय, महानगर पालिका शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक लातूर पिन कोड. ४१३५१२ येथे दिनांक १५ सप्टेंबर २०२२ पर्यत प्रत्यक्ष विंवा पोष्ट अथवा कुरिअरद्वारे पाठवावेत. उशीरा येणाछ्या प्रवेशिकांचा विचार केला जाणार नाही. तरी या स्पर्धेमध्ये ज्यास्तीत ज्यास्त स्पर्धकांनी सहभागी व्हावे असे अवाहन सुपर्ण जगताप, दिपरत्न निलंगेकर, अभय मिरजकर, प्रा.डॉ.सितम सोनवणे, ॲड. राहूल मातोळकर, काशिनाथअप्पा बळवंते, डॉ. दत्तात्रय दगडगावे, ॲड. गोपाळ बुरबुरे, डॉ.बी.आर.पाटील, शिवशंकर चापुले, ऋषीकेश दरेकर, प्रा.डॉ. मनिषा धोत्रे, प्रा.शिल्प सुरवसे यांनी केले आहे.

# रेणापूर तालुक्यातील रामवाडी (ख), नरवटवाडी ग्रामपंचायतीवर भाजपाची सत्ता



**लातूर /प्रतिनिधी**

भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात रेणापूर तालुक्यातील रामवाडी (ख) आणि नरवटवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपाने एक हाती सत्ता मिळवली असून या निवडणुकीत मनसेचे किसान आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे, ओमप्रकाश गोडभरले, रेणा कारखान्याचे संचालक अनिल कुटवाड आदी दिग्गज पुढाऱ्यांच्या पॅनलचा मतदारांनी धुव्वा उडविला. नवनिर्वाचित सर्व ग्रामपंचायत सदस्यांचा आ. कराड यांनी सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. रेणापूर तालुक्यातील रामवाडी (ख) आणि नरवटवाडी ग्रामपंचायतसाठी ४ ऑगस्ट गुरुवार रोजी मतदान झाले या मताची मोजणी ५ ऑगस्ट शुक्रवार रोजी होऊन यात भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वातील भाजपाच्या पॅनलने रामवाडी ख. येथे सात पैकी सात आणि नरवटवाडी येथे सात पैकी पाच जागा जिंकून एक हाती सत्ता मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. रामवाडी (ख) येथील ग्रामपंचायत निवडणुकीत जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले, भाजपाचे धडाडीचे कार्यकर्ते महेंद्र गोडभरले यांच्या ग्राम विकास पॅनलचे सर्वच्या सर्व सातही उमेदवार शंभरहून अधिक मताच्या फरकाने विजयी झाले या निवडणुकीत ओमप्रकाश गोडभरले आणि अनिल कुटवाड यांच्या परिवर्तन पॅनलचा मतदारानी धुवा उडवीला. विजयी उमेदवारात पांडुरंग कलूरे, शाहूताई नराळे, रोहिणी सुरवसे, सुवर्णा दिवटे, रोहिणी गोडभरले, शिवकर्ण सुरवसे यांचा समावेश आहे. नरवटवाडी ग्रामपंचायत निवडणुकीत भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर आणि माजी सभापती सौ. अयोध्या आंबेकर यांच्या ग्रामविकास परिवर्तन पॅनलने मनसेचे किसान आघाडीचे प्रदेशाध्यक्ष संतोष नागरगोजे यांच्या पॅनलचा दणदणीत पराभव केला. अटीतटीच्या झालेल्या या लढतीत ग्राम विकास परिवर्तन पॅनलचे ज्ञानदेव आंबेकर, सुकेश शिंदे, सत्यभामा आघाव, रोहिणी आघाव आणि कविता आंबेकर यांनी विजयाची बाजी मारली. रामवाडी आणि नरवटवाडी येथील नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्यांचा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांनी सत्कार करून त्यांचे अभिनंदन केले. मिळालेल्या संधीच विकास कामातून सोनं करावे, दोन्ही गावाच्या विकास कामासाठी कसल्याही प्रकारचा निधी कमी पडणार नाही असे सांगून आजपासूनच जिल्हा परिषद निवडणूकीसाठी कामाला लागावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भाजपाचे सरचिटणीस विक्रम शिंदे, तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, जिल्हा उपाध्यक्ष सतीश आंबेकर, वसंत करमुडे, महेंद्र गोडभरले, सुरेंद्र गोडभरले, माऊली नराळे, श्रीकृष्ण पवार, शालिक गोडभरले, दत्ता अंबेकर, सदाशिव राठोड, गोविंद चिताडे, रमेश गोडभरले, हणमंत कुटवाड, रघुवीर गोडभरले, विनोद अंबेकर, ज्ञानेश्वर गोडभरले यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## मराठवाडा मुक्ती गाथा!

# मराठवाडा हे नाव पडले कसे...?




मराठवाडा स्वातंत्र्य होऊन १७ सप्टेंबर रोजी ७४ वर्षे पूर्ण होऊन ७५ वर्षात प्रवेश करेल.. त्यानिमित्ताने मराठवाडा काय होता.. इथे निजामशाही कशी आली.. त्या निजामशाहीच्या काळात काय परिस्थिती होती. त्या हुकूमशाही विरोधात जो लढा उभा राहिला तो कसा उभा राहिला आणि अखेर १७ सप्टेंबर १९४८ रोजी हा भाग निजामशाहीच्या जोखडातून मुक्त झाला ते आपण.. आज पासून रोज सतरा सप्टेंबर पर्यंत जाणून घेऊ या....!!

**मराठवाडा हे नाव कसे पडले**

सम्राट अशोकाच्या १६ महाजनपदा पैकी दोन महाजनपदे एक अश्मक आणि दुसरे मूलक हे गोदावरीच्या खोऱ्यात नांदणारी.. हे दोन्ही महाजनपदात बहुतांश लोकं महाराष्ट्री प्राकृत बोलणारी.. सातवाहन राजा हाल यांनी ७०० गाथा एकत्र करून संपादित केलेला गायासप्तशती म्हणजेच गाथा सप्तशती ही प्राकृत मधून असलेली निर्मिती... यात या गोदावरी खोऱ्यातील लोकांचे लोक जीवन प्रतिबिंबीत झाले आहे. यातून एकच ध्वनीत होते की हा प्रदेश म्हणजे मराठीचे आद्य रूप महाराष्ट्री प्राकृत बोलणारा प्रदेश... पुढे अनेकांनी या प्रदेशावर आपली हुकूमत गाजवली आणि १७२४ मध्ये दिल्लीची सुभेदार निजाम उल मुल्क या निजामशहाने हैद्राबाद मध्ये निजामशाही स्थापन केली. यात तीन भाषा बोलणारे प्रदेश होते.. एक तेलगू (आंध्र), कन्नड (कर्नाटक) आणि मराठी ( मराठवाडा).. यात लातूर म्हणजे पूर्वाश्रमिचा उस्मानाबाद जिल्हा मराठी बोलणाऱ्या लोकांचा शेवटचा भाग.. म्हणजे निजामाच्या काळात भाषे प्रमाणे प्रदेशाची नावे झाली आणि मराठी बोलणाऱ्या लोकांचा मराठवाडा हे नाव कायम झाले.

**मराठ्यांच्या लातूर जिल्ह्यातील हालचाली**

अहमदनगरच्या निजामाच्या पाडावानंतर दक्षिणेत आदिलशाही आणि कुतुबशाही या दोन सम्राज्यांनी मुघलांचे मांडलिकत्व पत्करले. ३ मार्च १७०७ औरंगजेबचा मृत्यू झाला आणि १२ जानेवारी १७०८ साली साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्यावर मराठेशाहीचा पुन्हा झेंडा फडकला आणि छत्रपती शाहू महाराज गादीवर आले. मराठ्यांचा राज्य विस्तार झपाट्याने झाला. धनाजी जाधव, नेमाजी शिंदे, दादो मल्हार, संभाजी निंबाळकर हे सरदार मराठ्यांच्या मोहिमेचे नेतृत्व करत होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलशाही कुमकुवत झाली. या दोन्ही शाह्या त्यांच्या मुघलांच्या मांडलिकत्वाखाली होत्या. वेळोवेळी निजाम आणि मराठयात तह होत गेले.. अनेक सुभ्यात मोठा महसूली हिस्सा मराठ्यांना मिळत होता. २७ डिसेंबर १७३२ रोजी छत्रपती शाहू महाराजांच्या साम्राज्याचे पेशवे बाजीराव व चिम्माजी आप्पा आणि निजाम यांची लातूर पासून आठ मैलावर मांजरा नदीच्या काठी असलेल्या रुई - रामेश्वर येथे ऐतिहासिक भेट झाली. **क्रमशः**

**(संदर्भ :-अर्ली हिस्ट्री ऑफ डेक्कन,- यझदानी, मोघलकालीन मराठवाडा, - ल. गो. काळे, छत्रपती शिवाजी महाराज - ग. ह. खरे )**

**- युवराज पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, लातूर**

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# दोड्डी तांड्यातून साडेतीन लाखांची ५१६५ लिटर हातभट्टी दारु जप्त

## सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर राज्य उत्पादन शुल्क विभागाने शुक्रवार २ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी तांड्यात एका घरात टाकलेल्या छाप्यात एका मोटरसायकलीसह ५ हजार १६५ लिटर हातभट्टी दारू व १ टन ११० किलो गुळ पावडर जप्त करून गुन्ह्यात ३ लाख ५९ हजार ४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सविस्तर वृत्त असे की, राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या निरीक्षक अ विभाग, ब विभाग, भरारी पथक व सीमा तपासणी नाक्याच्या पथकाने शुक्रवार २ सप्टेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दक्षिण सोलापूर तालुक्यातील दोड्डी तांड्यातील भिमराव काशिनाथ राठोड वय ४२ वर्षे, रा. दोड्डी तांडा, ता. दक्षिण सोलापुर याच्या राहत्या घरी धाड टाकली असता त्याच्या घरात व घरासमोरील २ पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारु व गुळ पावडर साठवून ठेवल्याचे आढळून आले. त्या ठिकाणी झडती घेतली असता २०० लिटर क्षमतेच्या ४ प्लास्टिक बॅरलमध्ये ८०० लिटर हातभट्टी दारू, ५० लिटर क्षमतेच्या ६८ प्लास्टीक कॅनमध्ये ३४०० लिटर हातभट्टी दारु, ८० लिटर क्षमतेच्या १२ रबरी ट्यूबमध्ये ९६० लिटर हातभट्टी दारु, १ लिटर क्षमतेच्या ५ प्लास्टीक बाटल्यांमध्ये ५ लिटर हातभट्टी दारु असा एकूण ५१६५ लिटर हातभट्टी दारुचा साठा जप्त केला, तसेच हातभट्टी दारु तयार करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या गुळ पावडरच्या ३० किलो क्षमतेच्या ३७ गोण्यातून १ टन ११० किलो गुळ पावडर जप्त करण्यात आले. तसेच सदर ठिकाणावरुन ४ रिकामे प्लास्टिक बॅरल, २० रिकाम्या रबरी ट्यूबा, १ वापरता मोबाईल, एक प्लास्टीक नरसाळे, १ मोटरसायकल हिरो होंडा स्प्लेंडर क्रमांक एमएच ०४ सीएक्स ५१२७ असा एकूण ३ लाख ५९ हजार ४५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी भिमराव काशिनाथ राठोड यास जागीच अटक करण्यात आली असून त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आला असून पुढील तपास निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क ब विभाग सदानंद मस्करे करीत आहेत. सदर कारवाई महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, संचालक (अंमलबजावणी व दक्षता) सुनिल चव्हाण, विभागीय उपआयुक्त पुणे विभाग अनिल चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर नितिन धार्मिक यांचे नेतृत्वात उपअधीक्षक आदित्य पवार, निरीक्षक अ विभाग संभाजी फडतरे, निरीक्षक ब विभाग सदानंद मस्करे, दुय्यम निरीक्षक उषाकिरण मिसाळ, अंकुश आवताडे, सुरेश झगडे, सुनिल पाटील, सहाय्यक दुय्यम निरीक्षक गजानन होळकर, बिराजदार, मुकेश चव्हाण, जवान ईस्माईल गोडीकट, अनिल पांढरे, प्रशांत इंगोले, प्रकाश सावंत, प्रियंका कुटे, शोएब बेगमपुरे, वाहनचालक संजय नवले व मारुती जडगे यांच्या पथकाने पार पाडली. जिल्ह्यात एकाच ठिकाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात हातभट्टी साठवणूकीविरोधात केलेली ही आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात दिनांक १ एप्रिल ते ३१ गस्ट या कालावधीत अवैध दारू विरोधात एकूण ७४६ गुन्हे नोंदविले असून त्यात ६८१ वारस गुन्हे असून ६४३ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर कालावधीत २०७५९ लिटर हातभट्टी दारु, १७८५ लिटर देशी दारु, ५९२ लिटर विदेशी दारु, ६८६ लिटर बीअर, २६३२ लिटर परराज्यातील दारु, ६४२९ लिटर ताडी, हातभट्टी दारु तयार करण्यासाठी लागणारे २ लाख ५३ हजार लिटर रसायन तसेच ७५ वाहनांसह एकूण १ कोटी ७८ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल विभागाकडून जप्त करण्यात आलेला आहे.

दरम्यान राज्य उत्पादन शुल्क सोलापूर विभागाकडून विशेष पथके नेमण्यात आली असून अवैध दारू, ताडी विक्री, निर्मिती, वाहतूकीवर सातत्याने कारवाया केल्या जात आहेत. तसेच सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही ठिकाणी अवैध हातभट्टी दारू, ताडी निर्मिती, वाहतूक, विक्री, साठा, बनावट दारू, परराज्यातील दारू याबाबत माहिती मिळाल्यास या विभागाच्या टोल फ्री क्रमांक १८००२३३९९९९ व व्हॉट्सअॅप क्रमांक ८४२२००११३३ वर संपर्क साधावा.

## ७ सप्टेंबरपर्यंत शेतकऱ्यांनी आधारशी ई-केवायसी करा; अन्यथा पुढील हप्ते मिळणार नाहीत; तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांचे आवाहन

**सोलापूर/प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना अंतर्गत नोंदणीकृत पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यासाठी केंद्र शासनस्तरावरून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. ३१ ऑगस्ट २०२२ पर्यत ई केवायसी प्रक्रिया करून घेण्याविषयी शेतकऱ्यांना सूचना देण्यात आल्या होत्या, मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात ई-केवायसी झाली नाही. यामुळे मुख्य सचिव यांनी व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे दिलेल्या सूचनेनुसार शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबर २०२२ पर्यत आधार क्रमांकाला ई केवायसी करून घ्यावी, अन्यथा संबंधित शेतकऱ्यांना पुढील हप्ते मिळणार नाहीत. १२ वा हप्ता मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी ७ सप्टेंबर २०२२ पर्यत ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन अक्कलकोट तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांनी केले आहे. कृषी, सर्व तलाठी, ग्रामपंचायत उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांची बँक खाते पडताळणी केलेल्या आधार क्रमांकाशी जोडून घेण्यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच शेतकऱ्यांना ई-केवायसीबाबत मार्गदर्शन करावे. पी.एम. किसान योजनेअंतर्गत सप्टेंबर २०२२ पासून वितरीत केले जाणारे हप्ते आधार क्रमांकाशी संलग्न केलेल्या बँक खात्यात जमा होणार असल्याने त्यासाठी ७ सप्टेंबर २०२२ पर्यत ई केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शेतकऱ्यांनी जिल्ह्यातील सीएससी सेंटर, आपले सेवा केंद्रामध्ये जावून किंवा शेतकऱ्यांनी स्वत:च्या मोबाईलवर ई-केवायसी करावी. केंद्र शासनाच्या धोरणानुसार योजनेतील लाभार्थ्यांचा डाटा अंतिम व सुनिश्चित करण्याची कार्यवाही विहित कालमर्यादेत पूर्ण करायची आहे. सर्व पात्र शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता संबंधित यंत्रणांनी घ्यावी. तसेच शेतकऱ्यांनी पुढाकार घेऊन आपल्या गावातील किंवा जवळील सीएससी सेंटर, आपले सेवा केंद्र किंवा स्वत:च्या मोबाईलवर ई-केवायसी करावी, असे आवाहनही सिरसट यांनी केले आहे.

# देवणी तालुका मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी राजकुमार पाटील यांची निवड



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुका मुख्याध्यापक संघाच्या अध्यक्षपदी राजकुमार पाटील यांची निवड कण्यात आली असून नुतन कार्यकारिणीची पुढील पाच वर्षासाठी ही निवड करण्यात आली. देवणी तालुका कार्यकारिणी मंडळ अध्यक्ष राजकुमार केशवराव बिरादार लासोना, उपाध्यक्ष युनूस करीमसाब अतनूरकर देवणी, सचिव भरत माधवराव देवणीकर (कोतवाल) कोनाळी, सहसचिव कांतातार्इ रामराव सोमवंशी गुरधाळ कोषाध्यक्ष, उमाकांत दिगंबरराव तवडे जवळगा, प्रसिध्दी प्रमुख सुनील शांतप्पा क्षीरसागर तळेगाव, सदस्य निळकंठ माधवराव बोडके वडमुरंबी,लातूर जिल्हा कार्यकारिणी सदस्य, उमेश वामनराव पाटील गौंडगाव,धनराज वैजनाथराव चिद्रे दवणहिप्परगा, गदगेप्पा सुभाषराव मानकरी गुरनाळ, विभागीय कार्यकारिणी सदस्य, रामलिंग नागनाथराव मुळे धनेगाव, सतिश शिवाजीराव शेंडगे बोरोळ, मुरलीधर दादाराव बोडके विळेगाव, निवडणूक निर्वाचन अधिकारी माजी मुख्याध्यापक तथा प्राचार्य फकरोद्दीन बुदरे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी मुख्याध्यापक तथा प्राचार्य गोपीनाथ सगर यांच्या उपस्थितीत या नूतन कार्यकारिणीची सुचक व अनुमोदक यांनी सांगितले वरुन चर्चेनंतर सर्वानुमते दिनांक २/९/२०२२ रोजी मौलाना आझाद विद्यालय देवणी येथे झालेल्या बैठकीत निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्यांचा मावळते तालुका अध्यक्ष मुख्याध्यापक प्राचार्य गदगेप्पा मानकरी यांचा उपस्थित मुख्याध्यापकांच्या हस्ते सत्कार करून भावी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी नुतन मुख्याध्यापक पदी नियुक्ती झालेल्या नवनाथ खुळे, श्रीमती ललिता शिंदे, राजकुमार बिरादार, सुनील क्षीरसागर, माधव मांजीबाळे, निळकंठ बोडके आदींचा सत्कार करण्यात आला. यावेळी म.गांधी विद्यालय आंबेगावचे मुअ. तथा प्राचार्य श्री सुधाकरराव मोरे पाटील यांना म. ज्योतीराव फुले शिक्षण परीषद तर्फे राज्यस्तरीय प्रशासनरत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सविस्तर प्रास्ताविक मुअ. उमेश पाटील, संचलन मुअ. भरत देवणीकर तर आभार मुअ. धनराज चिद्रे यांनी केले. या बैठकीला तालुक्यातील जवळपास सर्व खाजगी शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एक जगाला जागवणारा आणि दुसरा जगवणारा अशा दोन दात्यांच्या स्मृतींना शिवरत्न पुरस्कारामुळे उजाळा -हभप अवधुत महाराज एकंबेकर

**लातूर/प्रतिनिधी**



जगाला जागवणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज आहेत त्यांनी रयतेतल्या सर्वसामान्या माणसाला जाग केल प्रजेच्या कल्याणासाठी स्वराज्य निर्माण करून जगासमोर मोठा आदर्श ठेवला हे कोणीही विसरू शकत नाही आणि विलासराव देशमुख यांनी चौफेर विकास करून जनतेला स्वताच्या पायावर उभं राहुन जगायला शिकवलं हे सर्वोत्तम उदाहरण आपल्या सर्वापुढे आहे. प्रत्येक क्षेत्रातील वेक्तीचां पुरस्कार देऊन गौरव केला जातो. शिवाजी महाराज यांच्या नावाचा व विलासराव देशमुख यांच्या स्मृतीदिनानिमीत्त लातूर मिशन वृतपत्र सामाजीक दायित्व सतत पार पाडत असते. यामुळेच खर्या अर्थाने त्याच्या स्मृतीस उजाळा मिळत आहे असे मत शिवरत्न पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा प्रसंगी हभप अवधुत महाराज एकंबेकर अध्यक्षीय भाषणात म्हणाले सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवराचे अभिनंदन केले. लातूरचे नाव इतिहासाच्या पानावर कोरले गेले आहे. अभिजीत देशमुख, विलासराव साहेबामुळे व सर्वसामान्याच्या झालेल्या प्रगती मुळे लातूरची ओळख वेगळीच झालेली आहे हे विसरता येणार नाही जगाच्या नकाशावर व इतिहासाच्या पानावर लातूरचे नाव कोरलं गेल आहे लातूर मिशन वृतपत्राने वेगळा ठसा उमटवुन बऱ्याच वर्षापासुन दरवर्षी पुरस्कार वितरणाचे कार्य करत आहे हे अखंड पणे चालावे असे अभिजीत देशमुख आपल्या भाषणात म्हणाले.

शिवरत्न पुरस्काराची ऊंची खुप वाढलेली आहे. संतोष सोमवंशी उपसभापती गेल्या बऱ्याच वर्षापासून शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा पाहतोय लातूर जिल्ह्य़ात एकमेव वृतपत्र आहे प्रशासनासह विविध क्षेत्रातील कर्तबगार वेक्तीचा गौरव करते इच्छा शक्ती असेल तर काय पण होऊ शकते. एवढा देखना सोहळा घेऊन एक आदर्श निर्माण केला यामुळेच शिवरत्न पुरस्काराची ऊंची खुप वाढलेली आहे असे मत संतोष सोमवंशी उपसभापती महाराष्ट्र बाजार समीती यांनी मांडले. विलासराव साहेबांच्या विचारांची परंपरा आपण पुढे घेऊन जाताय स्मीता खानापुरे माजी महापौर मी महापौर असताना वृतपत्राची सुरवात झाली विलासराव साहेबाच्या विचार हे सर्वाना दिशा व प्रेरणा देणारे आहेत त्याचा वारसा आपण सर्वानी जपला पाहिजे अशा कार्यक्रमातुन त्यानी केलेल्या कामांना खरोखर ऊजाळा मिळतो हे काम खुप मोठ आहे भविष्यात पण निरंतर शिवरत्न पुरस्कार वितरण सोहळा चालु रहावेत अशा शुभेच्छा स्मीता खानापुरे यांनी दिल्या. पुरस्कार देऊन बहुमान केल्यामुळे वेक्तीच वेगळ महत्त्व प्राप्त होते. गजानन भातलवंडे पोलिस निरीक्षक स्था.गु.शा.लातूर समाजात वावरत असताना कार्य करताना एखादी कौतुकाची थाप पाठीवर मिळाल्यास वेगळीच उर्जा मिळते उत्साहा वाढतो पुरस्कारामुळे त्या वेक्तीच्या जीवनाला एक वेगळेच महत्त्व प्राप्त होते हा तर शिवरत्न पुरस्कार आहे याचे महत्त्व व ऊंची खुप मोठी आहे असे पुरस्काराला उतर देताना गजानन भातलवंडे म्हणाले. शिवरत्न पुरस्कार प्राप्त मान्यवरांची काम करण्याची जबाबदारी आणखी वाढली. भारत जाधव अध्यक्ष शिवदर्शन फाऊंडेशन. दरवर्षी समाजात व प्रशासनात उत्कृष्ट काम करणाऱ्या वेक्तीना शिवरत्न पुरस्काराने गौरवण्याचा योग येतो त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने व विलासराव देशमुख साहेबांच्या आठवणी दरवर्षी या निमित्ताने तेवत रहातात या हेतुने शिवरत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येतो अनाथ व गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन लातूर मिशन वृतपत्राचा वर्धापन दिन व स्मृतीदिन साजरा होतो पुरस्कार प्राप्त मान्यवराची आणखी समाजात जबाबदारी वाढली आहे असे प्रस्तावित भाषणात भारत जाधव म्हणाले कार्यक्रमास सर्जेराव मोरे चेअरमन रेणा कारखाना सुमित वाघ उपस्थित होते मान्यवरांच्या हस्ते. या वेळी शिवरत्न पुरस्कार बाबु खंदाडे सरपंच गंगापुर, दतात्रय गिरी उपमुख्य कार्य अधिकिरी जि.प.लातूर, गजानन भातलवंडे पोलिस निरीक्षक, सुधीर देशमुख नायब तहसीलदार लातूर, रोहन जाधव उपअभियंता लातूर, चिराग सेनमा संचालक आयायबी, डॉ.धर्मवीर भारती बांधकाम क्षेत्र, नागनाथ खंदाडे मंडळ अधिकारी, विलास मलिशे अव्वल कारकुन, गोकर्णा जाधव ग्रंथपाल यांना पुरस्कार देऊन प्रमुख पाहुण्याच्या हास्ते गौरविण्यात आले तसेच अनाथ व गरजु विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बालाजी कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन तानाजी घुटे यांनी मानले कार्यक्रम यशस्वीतेसाठी परमेश्वर घुटे उपसंपादक सुरेश काचबावार कार्यकारी संपादक, श्रीराम गायकवाड, दयानंद माने, प्रा.बालाजी वाघमारे, अमित तिकटे, कैलास ढोले गोविंद जगताप, दीपक बोराडे, बालाजी कांबळे, अॅड नामदेव शिंदे, विष्णु शिंदे, महेश राठोड, सादिक शेख, श्रीमंत होळे, अजित दुटाळ, मंगेश आडे, तुकाराम जोगदंड, दिपक शिंदे, ओमकार सरडे, ऋषिकेश मोरे, संपत भिसे, अमर जाधव, सुरज मगर, गणेश भोसले, प्रदिप पटाडे, सोपान जाधव, दयानंद स्वामी, उमेश भिसे, ईश्वर पानढवळे या सह महिला, प्रशासनातील अधिकारी कर्मचारी पत्रकार बांधव, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भाजपाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी गोविंद गिरी

अहमदपूर : अहमदपूर तालुक्यात सामाजिक व राजकीय क्षेत्रात अग्रेसर असलेले गोविंद भगवानराव गिरी यांची भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी नुकतिच निवड झाली आहे. गेली अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात गोविंद गिरी यांचे उल्लेखनीय असे काम असल्याने त्या कामाची दखल घेऊन त्यांची लातूर जिल्हा भारतीय जनता पार्टी च्या जिल्हा उपाध्यक्ष पदी निवडीचे पत्र भारतीय जनता पक्षाचे जिल्हा अध्यक्ष आमदार रमेश अप्पा कराड यांच्या हस्ते व भारतीय जनता पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी मंत्री विनायकराव पाटील, जिल्हा परिषद सदस्य अशोकराव केंद्रे यांच्या उपस्थितीत नुकतेच देण्यात आले आहे. गोविंद गिरी यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अनेक वर्षे काम केले आहे गेल्या तीन वर्षापूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री तथा विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत व माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या पुढाकाराने भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला होता. केलेल्या कामाची दखल घेऊन आज गोविंद गिरी यांना भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. गोविंद गिरी यांच्या निवडीबद्दल अहमदपूर तालुक्यासह जिल्ह्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील अनेकांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# बोळेगाव येथील श्री गणेश मंडळाच्या वतीने कोरोना लसीकरण मोहीम संपन्न



**देवणी/प्रतिनिधी**

देवणी तालुक्यातील बोळेगाव येथील श्री गणेश मंडळाच्या वतीने गुरुवारी दि. १ ऑगस्ट रोजी कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिम घेण्यात आली. या मोहिमेत गावातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग नोंदवला. सद्यस्थितीत कोरोना संसर्ग नियंत्रणात असला तरी कोरोना पासून बचावासाठी कोरोना प्रतिबंधक लस उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे लसीकरण मोहीम गतिमान करण्याच्या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती श्री गणेश मंडळ अध्यक्ष नवनाथ स्वामी बोळेगावकर यांनी दिली. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष संगमेश्वर मुस्तापुरे सचिव बालाजी मुस्तापुरे, वैजनाथा स्वामी, अविनाश झेरीकुंटे, शिवलिंग हिंडे, संजीव आंबेवाले, माधव जडगे यांनी परिश्रम घेतले. यावेळी आरोग्य विभागाचे डॉ. मोना सरवदे, सिंधू देवणीकर, सुनील बिरादार, आशा कार्यकर्ती छाया गायकवाड, तानाजी आंबेवाले, रविशंकर पाटील, शंकर भंडे, वीरकुमार स्वामी, कृष्णाजी चौधरी, शहाजीराव कोकरे, शांतकुमार गोटे, सोमनाथ स्वामी, महेश झेरीकुंठे तसेच आदी सामाजिक व राजकीय कार्यकर्त्यांनी भेटी देऊन लसीकरणासाठी आलेल्या नागरिकांना प्रोत्साहित केले.

# रॉक गणेश मंडळाचे रक्तदान शिबिर संपन्न




**औसा/प्रतिनिधी**

औसा येथील रॉक गणेश मंडळ आणि भालचंद्र ब्लड बँक यांच्या संयुक्त विद्यमाने २०२२ या वर्षीच्या सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक २ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष सुरेशप्पा कारंजे यांच्या हस्ते करण्यात आले. औसा शहर व तालुक्यातील ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे शिबिरामध्ये सहभाग नोंदवून रक्तदान हे जीवनदान याची प्रचिती आणून दिली. गरजू रुग्णांना वेळेत रक्तपुरवठा करता यावा या उदात्त हेतूने रॉक गणेश मंडळांनी हा उपक्रम राबविला. रॉक गणेश मंडळाच्या माध्यमातून विसर्जन मिरवणुकीमध्ये आकर्षक देखावा आणि अत्यंत शांततेत विसर्जन करण्याची व शिस्तीत मिरवणूक काढण्याची परंपरा आजही कायम आहे. रॉक गणेश मंडळाचे अध्यक्ष सागर सुरेशप्पा कारंजे यांनी आपल्या मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे पूर्ण झाल्यामुळे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा देखावा गणेश मंडळाच्या स्थापना सजावटीमध्ये मंडळांनी केला आहे. यावर्षीही रॉक गणेश मंडळाच्या वतीने विविध सामाजिक कार्यक्रम घेणार असल्याची माहिती रॉक गणेश मंडळाचे अध्यक्ष सागर कारंजे यांनी बोलताना दिली. या वेळी रुपेश कारंजे, सागर कारंजे, गणेश मंडळाचे उपाध्यक्ष सिद्रामप्पा कुर्ले, जयराज लद्दे, सचिव. सचिन कल्याणी, कैलास पाटील, संजय लाखादिवे, शिवशंकर हूरदळे, कलाप्पा लद्दे, कीर्तिकुमार माळी, सुधाकर बेंबडे, महेंद्र कारंजे उपस्थित होते.

# सामान्य माणसाचे प्रश्न मांडण्याचं लिखाण समुद्रे यांनी केले -दासू वैद्य




**लातूर/प्रतिनिधी**

जीवन जगताना सामान्य माणसाची विविध कारणांनी घुसमट होते.ही घुसमट करणाऱ्या प्रश्नांचा शोध घेऊन त्यांची सोडवणूक करण्यासाठी मार्गही दाखवण्याचे काम अरुण समुद्रे यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून केले, असे मत ज्येष्ठ साहित्यिक दासू वैद्य यांनी व्यक्त केले. पत्रकार अरुण समुद्रे यांनी देवगिरी तरुण भारत, साप्ताहिक विवेक, लोकराज्य यामध्ये लिहलेल्या लेख आणि बातम्यांचा संग्रह असणारा 'लक्षवेधी' या ग्रंथाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन झाले. या समारंभात प्रमुख अतिथी म्हणून दासू वैद्य बोलत होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रुद्राणी इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडचे चेअरमन विवेक देशपांडे तर पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार तथा संपादक मनोहरराव कुलकर्णी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास खा.सुधाकरराव शृंगारे, माजी मंत्री आ.संजय बनसोडे, आ.अभिमन्यू पवार, माजी आमदार वैजनाथ शिंदे, पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार आदींसह मान्यवर उपस्थित होते. मनोगत व्यक्त करताना दासू वैद्य यांनी पुस्तक प्रकाशाचा हा सोहळा मंगल सोहळा असल्याचे म्हटले. लक्षवेधीमध्ये ३४ लेख आहेत.हे लेख म्हणजे लुकलुकणारे ३४अक्षर दिवे आहेत. अरुण समुद्रे यांच्या लेखनात तळमळ आहे.ज्याला प्रश्न पडतो तो व्यक्ती जिवंत मानला जातो.पत्रकार आणि लेखकांनाही असे प्रश्न पडतात. प्रश्न पडल्यानेच समुद्रे यांची लेखणी कार्यरत राहिली. त्यांनी सामान्य लोकांचे प्रश्न नुसते मांडलेच नाहीत तर त्याची उत्तरेही शोधून दिली, असेही वैद्य म्हणाले. विवेक देशपांडे यांनी अरुण समुद्रे यांच्या प्रवासाचा मी एक भाग असल्याचे मत व्यक्त केले. इतरांच्या प्रगतीत आनंद मानणारा हा पत्रकार आहे. समाजाला ज्ञान देणारा व्यक्ती आणि विरळा मित्र अशी त्यांची ओळख सांगता येईल. संघावरील निष्ठेपायी चांगली नोकरी त्यांनी नाकारली. विधिमंडळात वार्तांकन करताना त्यांची पत्रकारिता उजळली. स्व. गोपीनाथराव मुंडे यांचा सल्लागार म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. मुंडे यांची संघर्ष यात्रा, लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी यांच्या यात्रांचेही वार्तांकन त्यांनी केल्याची आठवण देशपांडे यांनी सांगितली. संपादक मनोहरराव कुलकर्णी यांनी स्तंभलेखनातून अनेक साहित्यिक घडल्याचे सांगत समुद्रे यांच्या लिखाणातून सकारात्मक संदेश मिळत असल्याचे म्हटले. अरुण यांनी मला गुरु म्हटले त्याअर्थी माझ्या शिष्याचा उत्कर्ष पाहून आनंद वाटतो. पुस्तक रूपाने अरुण यांना सरस्वतीचा प्रसाद मिळालेला आहे, असेही ते म्हणाले. पत्रकार अतुल देऊळगावकर, प्रदीप नणंदकर, कल्पना भट्टड यांनीही यावेळी आपल्या भावना व्यक्त केल्या. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. पीयुष देशमुख, निखिल समुद्रे, सायली देशमुख यांनी उपस्थितांचे स्वागत केले. अरुण समुद्रे यांनी मनोगत व्यक्त करताना पुस्तक प्रकाशनामागची भूमिका विषद केली. यावेळी नागपूर तरुण भारतचे संपादक गजानन निमदेव व के.के. ग्राफिक्सचे किरण कुलकर्णी यांचा विवेक देशपांडे यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन निखिल प्रा. सायलीसमुद्रे देशमुख व निखिल समुद्रे यांनी केले. निखिल यांनी उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी नॅचरल शुगरचे चेअरमन बी.बी. ठोंबरे, रेणा कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील, डॉ.पोतदार, कमलेश ठक्कर, भूषण दाते, दयानंद संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, ॲड.व्यंकट बेद्रे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे, जि.प.चे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, उद्योजक दिलीप माने, अशोक गोविंदपुरकर, अतुल ठोंबरे, संपत पाटील, भारत सातपुते, कुमुदिनी भार्गव, प्रविण सरदेशमुख, सुधीर धुतेकर, संजय जेवरीकर, अनिल अंधोरीकर, डॉ.राधेश्याम कुलकर्णी, उत्तम होळीकर, धनंजय कुलकर्णी, सुनील देशपांडे सारोळकर, पत्रकार अशोक चिंचोले, संगम कोटलवार, हरी तुगावकर, रामानुज रांदड, रागिनी यादव, अजय महाजन, संतोष मुक्ता, दीपरत्न निलंगेकर यांच्यासह समाजाच्या विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

# बिल्कीस बानो प्रकरणातील आरोपींच्या शिक्षामाफी विरोध राष्ट्रवादीचे आंदोलन!




**वाडा/प्रतिनिधी**

गुजरात येथे उसळलेल्या २००२च्या दंगलीमध्ये बिल्कीस बानो या सहा महिन्यांच्या गर्भवती महिलेवर सामूहिक अत्याचार करण्यात आला होता. तसेच तिच्या तीन वर्षाच्या मुलीसह परिवारातील सर्व सदस्यांना ठार मारले होते.याप्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने अकरा जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. मात्र स्वातंत्र दिनाचे औचित्य साधून या आरोपींना मुक्त करण्यात आले आहे.

गुजरात सरकारच्या या शिक्षामाफीच्या विरोधात राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने वाडा तालुका अध्यक्षा मृणाली नडगे यांच्या नेतृत्वाखाली वाडा येथे आंदोलन करून मोदी सरकारचा निषेध करण्यात आला. याप्रसंगी अश्विनी भोईर महिला शहराध्यक्षा, सुचीता पाटील माजी सभापती तथा नगरसेविका, रोहिणी शेलार गटनेत्या जिल्हा परिषद पालघर, भक्ति वलटे जिल्हा परिषद सदस्या, अक्षदा चौधरी जिल्हा परिषद सदस्या, पुनम पथवा पंचायत समिती सदस्या, सुचिता फराड पंचायत समिती सदस्या, संजना बेंडकोली नगरसेविका शहराध्यक्ष, विक्रमगड शहर, विराज पाटील- विक्रमगड विधानसभा युवक अध्यक्ष, विमलधर्म भास्कर- सामाजिक न्याय शहर अध्यक्ष, शानिदास फराड- माजी सरपंच खरिवली ग्रामपंचायत यांच्यासह अनेक महिला उपस्थित होत्या.

# वाडा शहरात पोलिसांचा रूटमार्च



वाडा : गणेशोत्सव शांततेत पार पडावा यासाठी वाडा पोलीस ठाण्याच्या वतीने शुक्रवारी (दि.२ सप्टेंबर) शहारात रूट मार्चचे आयोजन वाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दशरथ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. वाडा पोलीस ठाणे येथून आगर आळी, भाजी मार्केट, वाणीआळी, मशिद नाका, परळी नाका, मुख्य बाजारपेठ, बस स्थानक, खंडेस्वरी नाका, पाटील आळी पुन्हा बस स्थानक या मार्गे रुटमार्चचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी वाडा पोलीस ठाण्याचे दहा अधिकारी, ३० कर्मचारी, पंधरा होमगार्ड, एस.आर.पी.चा एक अधिकारी व वीस कर्मचारी, ११२ क्रमांकाच्या दोन बाईक, दोन व्हॅन जव्हार स्ट्रायकिंग तेरा कर्मचारी व एक जीप असा फौजफाटा घेऊन रूटमार्च काढण्यात आला.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते राज्य मैदानी स्पर्धा आणि विविध खेळ प्रकारात पदक प्राप्त विजेत्या खेळाडूंचा सत्कार



पालघर : मेजर ध्यानचंद यांची जयंती व राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त मुंबई व नाशीक येथे आयोजित करण्यात आलेल्या राज्य मैदानी स्पर्धेत, पालघर जिल्ह्यातील पदक प्राप्त विजेत्या खेळाडूंचा सत्कार जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आला. यावेळी जिल्हा क्रीडा अधिकारी, सूहास व्हनमाने, प्रकाश वाघ, राकेश सावे, तसेच विजेते खेळाडू आणि खेळाडूंचे पालक उपस्थित होते. जिल्ह्याला एथलेटिक्स, बॅडमिंटन राज्य स्पर्धा तसेच विविध खेळ प्रकारात, प्रथमच १३ पदके प्राप्त झाले आहे. विजेत्या खेळाडूंनी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांची जिल्हाधिकारी कार्यालय येथे भेट घेतली. यावेळी जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

पान १ वरून...

## क्रिकेट सामन्याच्या रात्री अचूक ...

येथील सुशांत हाके व बीएसएनएल क्वार्टसमागे राहणारा सौरभ साळुखे हे त्याचे जिवाभावाचे जिगरी मित्र होते. ते तिघे ही एकत्र खात पित पार्टी करायचे. तसे ते तिघे ही गुन्हेगारी प्रवृतीचे होते.का रे का म्हणून उत्तर देणारे तिघे ही होते. ते जरी जवळचे मित्र असले तरी त्याचेत विस्तव देखील जात नव्हता. एकमेकांना पाण्यात पाहणे एकमेकांची उठ्ठी काढणे हा त्याचा उदयोग होता. दारू पिऊन एकमेकांच्या अंगावर जात भांडण उकरून काढण्यात ते तिघे ही माहिर होते. त्यातच राहुल हा महानगरपलिकेत सफाई कामगार म्हणून काम करीत असल्याने त्याला पगार ही भरपुर होता.त्यामुळे त्याच्या खिशात नेहमी पैसे खुळखुळत असायचे. सुशांत हाके याचे पदवी पर्यतचे शिक्षण झाले असल्याने तो आपल्या भावाच्या बांधकाम साईटवर सुपरवायझर म्हणून काम करीत होता. तर सौरभ हा आयजीएम हॉस्पिटलमध्ये ठेकेदार तत्वार लॉड्रीबॉय म्हणून काम करीत होता. या तिघात जरी मैत्री असली तरी राहुल हा सुशांत आणि सौरभ यांना म्हणावे तसा मान देत नव्हता. सुशांत हा तिघात वयाने मोठा होता. तरी ही राहुल हा त्याला का रे म्हणून बोलवत होता.तर सौरभ याला कधी कधी डोळे वटारून बोलत होता. त्यामुळे त्या तिघांत नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणातून वाद विवाद हा होत होता.सुशांत आणि सौरभ हे राहुल याला तुझे वागणे बोलणे बरोबर नाही,तु आमच्याशी नीट बोलत नाहीस आम्ही तुझे मित्र आहोत,दुश्मन नाही असे समजावून सांगत नीट वागण्याचा सल्ला देत होते.तरीही राहुल याच्या वागण्या बोलण्यात बदल होत नव्हता. तो स्वत:चे वागणे आणि बोलणे खरे करीत होता.त्याच्या घरी मित्रत्वाच्या नात्याने जरी ते दोघे कधी आले तर तो त्यांना अपमानस्पद वागणूक देत होता.त्यामुळे सुशांत आणि सौरभला त्याचा राग येत होता.कधी पार्टीला गेले की,तो पैसे ही खर्च करीत नव्हता. उलट त्या दोघांनाच तो डब घालून त्यांनाच खर्च करायला लावत होता. त्याचे असे वागणे बघून ते दोघे त्याला तुला एवढा पगार असताना ही तू तुझ्यासाठी खर्च झालेले पैसे परत देत नाहीस असे बोलत होते. त्याच्या बोलण्याचा त्याचेवर कोणताही परिणाम होत नव्हता.उलट तो त्यांना उध्दटपणे बोलून त्याचेच खरे खोटेपणा काढत होता. त्यामुळे त्याच्या अहंकारी स्वभावाला ते दोघे कंटाळलेले होते. त्याचे बोलणे ताठ असल्याने आणि तो नुसत्याच मोठ मोठया गप्पा मारत असल्याने यांला कसे वठणीवर आणायचे याचा ते दोघे विचार करीत होते. तो आपला मित्र आहे म्हणून ते त्याचे उध्दट बोलणे ही सहन करीत होते. पण तो त्याचा उलट गैरफायदा घेत होता. आपलेच खाऊन आपलीच मापे तो काढत असल्याने सुशांतला राग येत होता. आपण वयाने त्याच्यापेक्षा खुप मोठे आहोत आणि हा आपल्याला का रे हो रे करतो आणि आपल्याला शहाणपणा सांगतो याची एकदा चांगलीच जिरवली पाहिजे असा त्याने विचार केला. तसे त्याने सौरभ याला ही बोलून दाखविले. सौरभला ही राहुलचा राग येत असल्याने त्याने ही सुशांतच्या हो मध्ये आपले हो मिसळले. याचा कायमचा काटा काढायचा याचा त्या दोघांनी विचार केला. तशी संधी ते दोघे शोधत असताना त्यांना तशी संधी ही लवकरच मिळाली. रविवार दि.२८ ऑगस्ट रोजी भारत पाकिस्तान क्रिकेट मॅचमध्ये भारताने हार्दिक विजय मिळविला.त्यानंतर संपुर्ण तरूणाई जल्लोष करण्यासाठी रस्त्यावर उतरली. त्यामुळे रात्री १ ते २ वाजेपर्यत तरूणांचा रस्त्यावर धिंगाणा चालू होता. त्या रात्री शहरातील चाइनीज गाडे आणि खाऊची गाडी उशिरापर्यत चालू होते. तर या तरुणांना रात्री १२ नंतर घरी जाण्यास पोलीस सांगत होते. त्यामुळे काही जण जल्लोष करून घरी परतले तर काही जण गणपती सण असल्याने मुर्त्या पाहत उशिरापर्यत फिरत होते. यातच तीन बत्ती चार चौकातील काही खाद्यपदार्थाच्या गाडया ही चालू होत्या. त्याचवेळी सुशांत याने राहुल याला फोन करून चौकात ये. आपण नाष्टा करूया असे सांगितले.तो ही इतर मित्रांच्या बरोबर जल्लोष करून नुकताच घराकडे परत आला होता. तो घरी आला आणि त्याला काही वेळातच सुशांतचा फोन आला.त्याचा फोन आल्यावर त्याने आपल्या आईला मी जरा चौकात नाष्टा करून येतो तसे सुशांतचा फोन ही आल्याचे त्याने आपल्या आईला सांगितले.आता इतक्या रात्री कशाला घराबाहेर जातोस गप्प झोप असे त्याचे आईने त्याला सांगितले. तरीही तो सुशांतचा फोन येत असल्याने तो घराबाहेर पडला.रात्रीचे १ वाजले होते. तो चौकात आल्यावर आधार बारच्या शेजारी एका चाइनीज गाडया वर ते नाष्टा करण्यासाठी थांबले.तेथीलच पद्मा मेडिकलच्या कट्टावर बसून सुशांत, राहुल आणि सौरभ हे तिघेजण नाष्टा करीत होते.आधीच या तिघांनी भरपूर दारू ढोसली असल्याने त्यांना तशी नशा ही झाली होती. ते तिघे ही नशेत नाष्टा करीत असताना एकमेकांचे उठ्ठे काढत होते. सुशांत आणि सौरभ यांना राहुलचा काटाच काढायचा असल्याने त्यांनी त्याला आपल्या बोलण्यात गुंतविले. नशेत राहुल याने मगरूरीची आणि घमेंडीची भाषा बोलत त्या दोघांना शिव्या घालत होता. त्यांना ही तेच पाहिजे होते. याचा संधीच फायदा घेत सुशांत याने राहुल याला आई घाल्या,कशाला आम्हाला शिव्या देतोस असे म्हणत त्याचे मानेवर पोटावर आपल्याकडील चाकूने सपासप वार केले. त्यातच सौरभ याने त्याला लाथा बुक्क्यांनी तुडवत कठ्टयावरून खाली पाडले. समोर मारामारी होत असताना गाडयावरील दोघेजण तेथे आले.पण सुशांतच्या हातातील चाकू बघून ते माघारी फिरले. रागाच्या भरात असणाऱ्या त्या दोघांनी परत त्याचे अंगावर दहा ते बारा वेळा वार केले. त्यात त्याचा रक्तस्त्राव झाल्याने तो जागीच रक्ताच्या थारोळ्यात पडला.त्यात तो गंभीर जखमी झाला होता. तर त्याचे वर वार करताना सुशांत याला ही जखम झाली होती. त्या अवस्थेत तो स्वतःची जखमेवर उपचार करण्यासाठी म्हणून आयजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल झाला. तर सौरभ हा तेथून आपल्या घरी जावून लपला. ते दोघे तेथून गेल्यावर तेथे असणाऱ्या एका व्यक्तीने या घटनेची माहिती जवळच असणाऱ्या शिवाजीनगर पोलीस स्टेशनला दिली. पहाटे पहाटे खूनाच्या घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पो.निरी.महादेव वाघमोडे हे आपल्या सहकार्यासह घटनास्थळी दाखल झाले.त्यांनी प्रथम गंभीर जखमी असलेल्या राहुल दियालु याला उपचारासाठी आयजीएम हॅस्पिटलमध्ये दाखल केले. या घटनेची माहिती पोलीसांनी जखमी राहूल याच्या घरच्या लोकांना दिली. ते ही आयजीएम हॉस्पिटल मध्ये आले. त्यापूर्वी पोलीसांनी घटनास्थळचा पंचनामा करून घटनपा पाहणाऱ्या लोकांच्याकडून माहिती घेतली होती. तर इकडे पहाटे ३ च्या सुमारास उपचार सुरू असताना राहुल याचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती त्याच्या मित्रांना मिळताच त्यांनी आयजीएम हॉस्पिटलमध्ये गर्दी केली होती. त्यामुळे वातावरण तणावपुर्ण बनले होते.राहुल दियालु याचा खून रात्री झाल्याचे महानगरपलिकेच्या इतर कर्मचारी साथीदारांना समजाताच त्यांना ही धक्का बसला होता. सोमवारी सकाळी या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड उपाधिक्षक बाबुराव महामुनी यांनी भेट दिली.त्यांनी घटनेची माहिती घेवून पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना दिल्या.पोलीस या घटनेचा तपास करीत असताना त्यांनी मयत राहुल याच्या आईकडून माहिती घेतली असता तिने पोलीसांना सांगितले की, रात्री त्याला कोणाचा तरी फोन आला होता.फोन करणाऱ्या व्यक्तीने त्याला नाष्टा करणाऱ्यासाठी तीन बत्ती चौकात बोलावून घेतले होते. या माहितीवरून पोलीसांनी मयत राहुल याच्या मोबाईल फोनचे कॉल रेकॉर्ड तपासले असता घटनेच्या काही वेळ अगोदर त्याच्या फोनवर सुशांत हाके याचा फोन आल्याचे निष्पन्न झाले.तसेच पोलीसांनी घटनास्थळा जवळील पद्मा मेडिकलचे व आधार बारचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता या दोन्ही टिकाणच्या सीसीटीव्हीमध्ये ही घटना कॅमेराबध्द झाली होती. त्यात संशयीत आरोपी स्पष्ट दिसत होते. त्यामुळे पोलीसांनी या फुटेजवरून संशयीतांची ओळख पटवली. या घटनेतील संशयीत आरोपी सुशांत हाके हा आयजीएममध्ये उपचार घेत असल्याची माहिती मिळताच पोलीसांनी मंगळवारी दुपारी त्याला आयजीएमधून ताब्यात घेतले. तर दुसरा संशयीत आरोपी सौरभ सांळुखे याला ही त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेतले.या घटनेची फिर्याद मयत राहुल याच्या आईने शिवाजीनगर पोलीस स्टेशनला दिल्यावर पोलीसांनी राहुल बाबु दियालू (वय २२) याच्या खून प्रकरणी त्याचे मित्र सुशांत शिवाजी हाके (वय ३०) रा.दातार मळा इचलकरंजी.आणि सौरभ सचिन सांळुखे (वय २५) रा.बीएसएन क्वार्टस मागे इचलकरंजी या दोघांच्या विरोधात गु,रजि.नं/२०२२ भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंदविला. पोलीसांनी त्यांना प्रथमवर्ग न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने या दोघांना ३ सप्टेंबरपर्यत पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान या दोघांनी आपला गुन्हा कबुल करून तो का आणि कशासाठी केला याची माहिती पोलीसांना दिली.पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरी.महादेव वाघमोडे याच्या मार्गदर्शनाखाली त्याचे सहकारी करीत आहेत. मित्र किती ही जवळचा असला तरी त्याचेवर कितपत विश्वास ठेवायचा हा ज्याचा त्याचा प्रश्न असतो. विश्वासघातकी मित्र असल्याने कधी कोण कोणाचा घात करेल हे काही सांगता येत नाही हेच घटनेवरून दिसून येते.

## कॉल सेंटरच्या आड काम ...

कॅनडा, ऑस्ट्रेलिया वगैरे देशातल्या कंपन्यांची कॉल सेंटर्सही भारतात कार्यरत आहेत. कॉल सेंटर्सची सेवा ही ३६५ दिवस, २४ x ७ असते. म्हणजेच वर्षभर, आठवडयाला २४ तास अविरत असते. कॉल सेंटर्स मधून काम करायचे असल्यास उच्च अथवा तांत्रिक शिक्षण असण्याची गरज नाही. तुम्ही केवळ दहावी-बारावी असाल, इंग्रजी चांगले असेल, बोलता येत असेल, संगणक वापरता येत असेल तर कॉल सेंटर मध्ये नोकरी करण्यास तुम्ही पात्र आहात असे म्हणता येईल. भारतात मुंबई, पुणे, दिल्ली, नॉयडा, बंगलोर, हैद्राबाद या मेट्रोजच्या बरोबरीने छोटया शहरांमधूनही ठिकठिकाणी कॉल सेंटर्स आहेत. परंतु या कॉल सेंटर मधून मुंबई शहरातमध्ये ऑनलाईन चॅटींग ॲप्लीकेशनव्दारे स्त्रियांना अश्लिल सेक्स चॅटींग तसेच अश्लिल व्हिडीओ सेक्स चॅटींग करण्यास प्रवृत्त केले जात आहेत. अशा प्रकारची माहिती पोलिसांना मिळाली होती. अश्लिल सेक्स चॅटींग तसेच अश्लिल व्हिडीओ सेक्स चॅटींग कॉल सेन्टरचा शोध घेवुन कॉल सेन्टर चालविणाऱ्यावर कारवाई करण्याचे आदेश वरिष्ठांकडून प्राप्त झाले होते . त्यानुसार गुन्हे अन्वेषण विभागाचे अधिकारी अशा सेंटरचा शोध घेत शहरात फिरत होतं. सोमवारी मुंबई गुन्हे शाखा क्रमांक ११चे प्रपोनि. विनायक चव्हाण यांना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, मालाडच्या काचपाडा, सिलक मिडीया ॲण्ड इंटरटेन्टमेन्ट, ७ वा माळा, जसवंती एलाईड बिझनेस सेन्टर, या ठिकाणी अशा प्रकारचे कॉल सेंटर सुरू आहे. त्यानुसार गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक विनायक चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली पो. नि. सचिन गवस, पो नि. भरत घोणे, स.पो.नि. अभिजीत जाधव, म.स.पो.नि. पुनम काळ, स.पो.नि. विशाल पाटील, अंमलदार रामचंद्र शिंदे, चंद्रसेन गायकवाड, सुधीर तरटे, सचिन खताते, प्रविण सावंत, सोनाली लाडे, रजीता सावंत, सारिका कदम, जयश्री गोसावी, चालक उपेंद्र मोरे तसेच कक्ष १२चे सपोनि रासकर, पोउनि खानविलकर, कक्ष-९चे मपोउनि पाटील, कक्ष ६ मसपोनि देशमुख व तसेच कक्ष-१०, ७ व ८ कडील अंमलदार इत्यादींनी कॉम्प्युटर तज्ज्ञांच्या मदतीने सदर कॉल सेंटरवर छापा टाकला. कॉल सेंटरमध्ये नोकरीला लागल्यावर नवखे असतांना तुम्हाला कॉल सेंटर एजंट म्हणून सुरुवात करावी लागते. प्रत्येक एजंटला त्याच्या वर्क स्टेशन' वर संगणक आणि दूरध्वनी हेडसेट दिलेला असतो. त्यांचे संगणक लॅन' ड्छ म्हणजेच लोकल एरिया नेटवर्क' द्वारे इतर संगणकांना आणि मुख्य कॉर्पोरेट ऑफिसना जोडलेला असतो. एजंटसचे मुख्य काम हे ग्राहकांशी संवांद साधणे, त्यांना मदत करणे, तक्रारी ऐकणे, नवीन उत्पादनांची माहिती देणे, नव्या योजनांचे टेली मार्केटींग करणे अशा प्रकारचं कॉल सेंटरचं काम असतं. मात्र इथे गुन्हे शाखेच्या पथकाने रेड केल्यावर ब्रिजेश दयाशंकर शर्मा उर्फ शांन विल्यम (वय ३५) रा. रुम नं. ५, सलीम खान चाळ, घरटनपाडा नं. २, दहीसर या व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याच्या कडे चौकशी केली असता, तो चामेट नावाच्या ऑनलाईन चॅटींग ॲप्लीकेशनवर रजिस्ट्रेशन केलेल्या नागरिकांना फ्री मध्ये चॅटींग आहे असे दाखवुन ज्यांनी रजिस्ट्रेशन केले आहे, त्यांनी तो ॲप ओपन करायचा. तो अँप ओपन केल्यास त्यांचेशी त्यांचे ऑफीसमधील मुलींकडुन अश्लिल सेक्स संभाषण करवुन घेत असे. तसेच ग्राहकांकडुन डिजीटल डायमंडच्या स्वरुपात पैसे स्विकारून समोरील चॅट करणाऱ्या ग्राहकांनी मुलींना डिजीटल डायमंड दिल्यास या मुली ऑनलाईन व्हिडीओ कॉलवर त्यांचे कपडे काढुन अश्लिल हावभाव करत असे. तसेच मुलींना अश्लिल सेक्स चॅट करण्यास भाग पाडत असे .अशा प्रकारचा गोरख धंदा गेली आठ महिने या कॉल सेंटरमध्ये सुरू होता. गुन्हे शाखेच्या पथकाने संपूर्ण कॉल सेंटरमध्ये तपासणी केली असता, या कॉल सेंटर मध्ये काम करणाऱ्या १२ मुली तसेच ऑफीसमध्ये काम करणाऱ्या इतर ५ मुली अशा एकूण १७ मुली मिळुन आल्या. पोलिसांनी या १७ मुलींची येथून सुटका केली आहे.कॉल सेंटरचा मालक ब्रिजेश दयाशंकर शर्मा उर्फ शांन विल्यम याला पोलिसांनी अटक करून त्याच्या विरुद्ध गु.प्र.शा., गु.अ. वि ११ येथे गु.नो.क्र.१३५/२०२२ (मालाड पोलीस ठाणे गु.नो.क्र. ११५४/२०२२) कलम २९४ भादवि सह , कलम ३, ८(१) महीलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम २०१६, सह कलम ६७ (अ) माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. यावेळी पोलिसांनी त्याने पुरविलेले व ऑफीसमध्ये मिळुन आलेले असे १९ मोबाईल फोन, एक लॅपटॉप व इतर साहीत्य जप्त करण्यात आलेले आहे.

ब्रिजेश दयाशंकर शर्मा हा येथे काम करणाऱ्या मुलींना वेगवेगळी अमीष दाखवून, चामेट या ऑनलाईन चॅटींग ॲप्लीकेशनद्वारे, त्यांचेकडुन व्हिडीओ सेक्स चॅट करवुन घेत होता. कोरोना पासून दोन वर्षे बेरोजगारिचा सामना करावा लागत असल्यामुळे व पैशाची नितांत गरज असल्यामुळे नाईलाजाने या तरूणी हे काम करीत होत्या. अशा प्रकारे व्हिडीओ कॉलद्वारे सेक्स रॅकेट चालविणाऱ्या गोरखधंद्याचा गुन्हे शाखेच्या पथकाने पदार्फाश करून मुलीचे उध्वस्त होणारे आयुष्य वाचविले आहे. ही कारवाई मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस सह आयुक्त (गुन्हे) सुहास वारके, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) एस. विरेश प्रभू, पोलीस उप-आयुक्त (प्र -१) संग्रामसिंह निशाणदार, सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रकटीकरण-उत्तर) काशिनाथ चव्हाण यांच्या मागदर्शनाखाली पार पाडली.

पान ८ वरून...

## बापरे... सोलापूर जिल्हा परिषदेच्या...

मग त्या' कर्मचाऱ्याला आवरणार कोण? असा सवाल राजू दिंडोरे यांनी साकोरे यांना केला. त्यावर साकोरे यांनी पाणीपुरवठा विभागाचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे यांना संपर्क साधून याबाबत योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत, असे दिंडोरे यांनी सांगितले. याला शेळके यांनीही दुजोरा दिला आहे.

# आ.रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत तरुणांचा भाजपात प्रवेश



**लातूर/प्रतिनिधी**

लातूर तालुक्यातील मौजे सेलू (बु) येथील अनेक तरुणांनी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी भारतीय जनता पार्टी प्रवेश केला. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस विक्रम काका शिंदे, भाजपाचे लातूर ग्रामीण अध्यक्ष अनिल भिसे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, म. गांधी तंटामुक्त समितीचे अध्यक्ष हंसराज सांडूर, सोमनाथ वाघमारे, राम बोयने यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

सेलू येथील माजी सरपंच राजकुमार बोयणे यांच्यासह भागवत सांडूर, लिंगराम दोरवे, पुंडलिक बोयणे, भगवान घोडके, हरिचंद्र बोयणे, दत्ता सुरवसे, बालाजी जाधव, संतोष सांडूर, लखन बोयणे, सागर वाघमारे, गोगा बोयणे, सागर जाधव, महादेव सांडूर, केशव सांडूर, नरसिंग सुरवसे, मनोज सुरवसे, महादेव दोरवे, शंकर वाघमारे, नितीन बोयणे, अजित बोयणे, मुकुंद सांडूर, गोविंद सांडूर, दीपक सुरवसे, निवृत्ती सांडूर, प्रतीक सांडूर, गोरख झरकर, ऋषिकेश सूर्यवंशी, दत्ता सांडूर इत्यादी तरुणांनी यावेळी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. प्रवेश केलेल्या सर्वांना भाजपात सन्मानाची वागणूक मिळेल कोणाच्याही विश्वासाला कधीही तडा जाणार नाही असे सांगून यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपा हा कार्यकर्त्याचा पक्ष आहे या पक्षात काम करणाऱ्यांना संधी मिळते. सात-आठ वर्षात देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी निराधारना घर, वीज पुरवठा, गॅस पुरवठा, मोफत राशन यासह अनेक योजना सुरू करून मोठा दिलासा दिला आहे. गेल्या अडीच वर्षात महाविकास आघाडी सरकारने कसलेही विकासाची कामे केली नाहीत. केवळ वसुलीचेच काम केले असून राज्यात नव्याने सत्तेवर आलेल्या एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणीस यांच्या नेतृत्वातील सरकारने एकापेक्षा एक राज्याच्या हिताचे महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत असे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की येणाऱ्या १५-२० वर्षात देशात आणि राज्यात भाजपाचेच सरकार राहणार यातील मात्र शंका नाही प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपल्या गावातील आणि परिसरातील सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणीची सोडवणूक करावी प्रत्येक कार्यकर्त्याच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे असा दिलासाही त्यांनी दिला.

# गायगव्हाण येथे १४ लाखांचा अवैध दारू साठा पकडला



**सोलापूर/प्रतिनिधी**

गायगव्हाण (तालुका सांगोला) येथे पत्र्याच्या शेडवर सांगोला पोलिसांनी छापा टाकून १४ लाख ११ हजार रुपये किमतीचा २१० बॉक्स देशी दारू साठा जप्त केला आहे. बुधवारी ३१ ऑगस्ट रोजी ही कारवाई करण्यात आली. याप्रकरणी तीन जणांना अटक करण्यात आली आह. शुभम राजेश वाघमारे (२३), किरण साधू खिलारे (२२), रवी अर्जुन खिलारे (३७) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. सांगोला पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांना गायगव्हाण तालुका सांगोला जिल्हा सोलापूर रस्त्यावर उत्तम भगवान रणदिवे यांच्या घराशेजारी पत्रा शेडमध्ये अवैध दारू साठा केल्याची माहिती मिळाली त्यांनी कटफळ तालुका सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी राजुलवार यांना कारवाई करण्याचे आदेश दिले.

त्यानुसार बुधवारी रात्री त्यांनी रवी राजुलवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू चौगुले, पोलीस नाईक परमशेट्टी, पोलीस कॉन्स्टेबल कुंभार यांच्या समवेत कारवाई मोहीम राबविले. यावेळी मोहोळ, पंढरपूर रोडवरील गार्डी ते गायगव्हाण मार्गावर उत्तम भगवान रणदिवे यांच्या घराशेजारी पत्राच्या शेड वर छापा टाकण्यात आला. तेथे तीन व्यक्ती पत्राशेडमध्ये काही बॉक्स आतल्या खोलीत लावत होते पोलीस आल्याचे दिसतात ते पळून जाताना त्यांना पकडले त्यांच्या ताब्यातून १४ लाख ११ हजार २०० रुपये किमतीचे अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी तेथून १४ लाख ११ हजार २०० रुपयांची देशी दारू टँगो पंच कंपनीचे २१० बॉक्स ताब्यात घेऊन जप्त केले. कारवाई दरम्यान शुभम राजेश वाघमारे, किरण साधू खिलारे, रवी अर्जुन खिलारे यांना अटक केली. ही सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, उपविभागीय पोलीस अधिकारी राजश्री पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी राजुलवार, सहाय्यक फौजदार कल्याण ढवणे, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू चौगुले, बापूसाहेब जवळे, विकास क्षीरसागर पोलीस नाईक केदारनाथ भरमशेट्टी, बाबासाहेब पाटील, पोलीस कॉन्स्टेबल अमोल कुंभार यांनी केली.

# लातूरमध्ये 'माझा एक दिवस माझ्या बळीराजा'साठी उपक्रमाला सुरुवात




**लातूर/प्रतिनिधी**

माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी हा उपक्रम शेतकऱ्यांच्या अडचणी, शेतकऱ्यांच्या योजना त्याची अंमलबजावणी ह्या संदर्भात त्यांच्या सोबत राहून जाणून घेण्यासाठी अशा प्रकारचा एक उपक्रम संपूर्ण राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. कृषी मंत्र्यापासून सचिवा पर्यंत सगळे वेगवेगळ्या गावी आज मुक्कामी निघाले आहेत. लातूर विभागाचे कृषीचे सहसंचालक साहेबराव दिवेकर लातूर तालुक्यातील हरंगुळला तर कृषी अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गवसाने उदगीर तालुक्यातील तादलापूर येथे मुक्कामी तर आत्माचे प्रकल्प उपसंचालक तथा कृषी विभागीय अधिक्षक कृषी अधिकारी आर.एस.पाटील निलंगा तालुक्यातील उस्तुरी या गावामध्ये मुक्कामासाठी जात आहेत.

**माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी उपक्रमात**

कृषिमंत्री, कृषी सचिव, कृषी आयुक्त, सर्व कृषी संचालक, विभागीय कृषी सहसंचालक, सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक हे निवडलेल्या गावांमध्ये मुक्काम करून संपूर्ण दिवस शेतकऱ्यांसोबत थांबून शेतकऱ्यांना शेती करत असताना वेगवेगळ्या अडचणींना सामोरे जावे लागते, त्या अडचणी जाणून घेणे... शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्यासंदर्भात काय करता येईल. ज्या गावी मुक्कामी थांबलो आहे. त्या गावांमध्ये विभागाच्या कोणत्या योजना राबवलेल्या आहेत. योजना राबवताना काय अडचण येतात. यासंदर्भात माहिती घेण्याचे काम करण्यात येणार आहे. आज दिनांक ३१ ऑगस्ट रोजी गावामध्ये मुक्काम करून शेतकऱ्यांशी हितगुज करणार आहेत. याकार्यक्रमास शेतकरी बंधूंनी उपस्थित रहावे, असे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक साहेबराव दिवेकर यांनी केले आहे.

**हा उपक्रम चालणार तीन महिने**

सप्टेंबर, ऑक्टोबर, नोव्हेंबर हे तीन महिने कृषी विभागाचे अधिकारी महिन्यातून तीन वेळा, तर जिल्हाधिकारी आणि महसूल यंत्रणा आणि कृषी संलग्न विभाग महिन्यात एक वेळा गावांना भेटी देणार असून शेतकऱ्यांशी चर्चा करून त्याचा अहवाल एकत्र करून शासनाकडे पाठवला जाणार असून त्यातून राज्यस्तरावर यावर योग्य तो अभ्यास करून पुढचे धोरण निश्चित करण्यासंदर्भात उपयोग होणार असल्याची माहिती कृषी अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गवसाने यांनी दिली.

# सिध्दापूर येथे चोरीच्या पाच मोटार सायकली जप्त; एकाला अटक



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील सिद्धापूर येथील इसमाकडून चोरीच्या पाच मोटारसायकली जप्त करून पाच गुन्ह्यांची उकल करून एकूण दोन लाख नऊ हजारांची मुद्देमाल जप्त करण्यात सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेला यश आली आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते (भा.पो.से.)न, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव, यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, सुहास जगताप यांना सोलापूर ग्रामीण जिल्हयातील वाढत्या मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांना आळा घालून गुन्हे उघडकीस आणणेकामी मार्गदर्शन करून पथक नेमणेबाबत आदेशित केले होते. त्या अनुषंगाने मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेकामी पोलीस निरीक्षक सुहास जगताप, स्थानिक गुन्हे शाखा यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील सहा.पोलीस निरीक्षक, अनिल सनगल्ले यांचे पथकास सुचना दिल्या होत्या. सहा.पोलीस निरीक्षक, अनिल सनगल्ले व त्यांचे पथक मंगळवेढा शहरातील एस.टी.स्टॅन्ड येथे मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांची माहिती काढण्याकरीता हजर असताना त्यांना गोपनियरित्या माहिती मिळाली की, मौजे सिध्दापूर ता. मंगळवेढा येथील एक इसमाकडे चोरीची मोटार सायकल असून तो चोरीच्या मोटार सायकलसह बोराळे नाका मंगळवेढा येथे थांबलेला आहे. त्यावरून तात्काळ त्याठिकाणी जावून मिळालेल्या बातमीप्रमाणे त्यास ताब्यात घेवून त्याचेकडे मिळून आलेल्या मोटार सायकलचे कागदपत्र बाबत विचारणा केली असता, तो उडवाउडवीची उत्तरे देवू लागला, त्यावेळी त्याचा अधिक संशय आल्याने त्याचेकडे कौशल्यपूर्ण तपास करता त्याने सांगितले की, मागील ४ ते ५ दिवसापूर्वी त्याच्या ओळखीच्या एका इसमाकडून विक्री करण्यासाठी घेतले असल्याचे सांगितले. सदर मोटार सायक बाबत खात्री केली असता, सदरची मोटार सायकल कामती पोलीस ठाणे गुरंन १९६/२०२२ भादविसंक ३७९ प्रमाणे दाखल गुन्हयातील असल्याचे समजले. त्यावरून त्याचेकडे अधिक विचारपूस करता त्याने सांगितले की, त्याच्या मित्राने चोरलेल्या गाडया आणून दिल्यानंतर आणखीन ४ मोटार सायकली कागदपत्रे नंतर आणून देतो असे सांगून त्याच्या गांवातील व ओळखीच्या लोकांना विक्री केल्याचे सांगितले आहे. त्यावरून त्याचेकडून ५ मोटार सायकली मिळून आल्या. सदर मोटार सायकलीची माहिती घेतली असता सदरच्या मोटार सायकली हया चोरीच्या गुन्हयातील असल्याने त्या गुन्हयाचेकामी जप्त करण्यात आल्या असून उघडकीस आलेल्या गुन्हयाची माहिती खालील प्रमाणे, कामती पो.ठाणे गुरंन १९६/२०२२ भादविसंक ३७९ प्रमाणे, अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाणे गुरंन ६८४/२०२१ भादविसंक ३७९, मंद्रुप पोलीस ठाणे गुरंन १४७/२०२२ भादविसंक ३७९, मोहोळ पोलीस ठाणे गुरंन ५५९/२०२२ भादविसंक ३७९, नाशिक येथील एमएच १५ जीवाय ३८८३ हिरो एचएफ डीलक्स. सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते (भा.पो.से.)ब. अप्पर पोलीस अधीक्षक हिंमत जाधव, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगल्ले स्थानिक गुन्हे शाखा, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, समीर शेख, सहाय्यक फौजदार विजया मोहिते व कामती पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी अंकुश माने, तपासिक अंमलदार साळवे यांनी बजावली आहे.

# लातूरमध्ये अद्यावत व सुसज्ज विज्ञान केंद्राची निर्मिती करणार- खा. सुधाकर शृंगारे



**लातूर/प्रतिनिधी**

संपूर्ण देशात लातूर शहराने शैक्षणिक क्षेत्रामध्ये नेत्रदीपक प्रगती साध्य केली आहे. आज लातूर पॅटर्न हा सर्व देशभर सर्वाच्या परिचयाचा आहे त्यामुळे लातूरमध्ये तंत्रज्ञानयुक्त, सुसज्ज आणि अद्यावत विज्ञान केंद्राची लवकरच निर्मिती लवकरच केली जाईल आणि यासाठी केंद्रसरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला जाईल असे प्रतिपादन खासदार सुधाकर शृंगारे यांनी बोलताना व्यक्त केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.२९ ऑगस्ट २०२२ रोजी स.११वा. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये द्वितीय पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संपन्न झाला यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड.सांबप्पा गिरवलकर हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी व बिजभाषक म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष आदिनाथ सांगवे, युवा नेत्या प्रेरणाताई होणराव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे, विद्यार्थी विकास समिती समन्वयक कॅप्टन प्रा.डॉ.बाळासाहेब गोडबोले आणि परीक्षा विभाग प्रमुख डॉ.शिवप्रसाद डोंगरे आदी मान्यवर उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी परीक्षा विभाग प्रमुख डॉ.शिवप्रसाद डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व मान्यवरांच्या समवेत प्रभात फेरी काढण्यात आली. त्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करून दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, डॉ.गीता गिरवलकर आणि चमुनी स्वागत गीत व विद्यापीठ गीत सादर केले. पुढे बोलताना खासदार सुधाकर शृंगारे म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी विज्ञान क्षेत्रामध्ये आपले करिअर बनवले पाहिजे. आजच्या युवकांनी संपूर्ण देशाचे नेतृत्व केले पाहिजे. लातूर लोकसभा मतदारसंघामध्ये विविध विकास कामाच्या माध्यमातून आजपर्यंत हजारो कोटी रुपये केंद्र सरकारच्या माध्यमातून आणले असून लातूर जिल्हा हा शैक्षणिक विकासासोबतच औद्योगिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांमध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण करेल यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याचेही ते म्हणाले. महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेद्वारे चालणाऱ्या सर्व युनिट्समध्ये शिकणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांना गुणवत्ताधारक व गुणवान बनवले जाते असे सांगून पदवी प्राप्त विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे त्यांनी अभिनंदन केले.

यावेळी बीजभाषक म्हणून बोलताना संस्थेचे उपाध्यक्ष आदिनाथ सांगवे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये शैक्षणिक विकासासोबत राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि क्रीडा विभागाच्या माध्यमातून उत्कृष्ट नागरिक निर्माण करण्याचे कार्य केले जात आहे. आपण सर्वांनी प्रेम, आनंद व निष्ठा याचा मानवी जीवनात अवलंब करून आनंदी जीवन जगले पाहिजे. आपण आपल्या जीवनात कष्ट, मेहनत आणि जिद्दीने यश संपादन केले पाहिजे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना परीक्षा विभाग प्रमुख डॉ.शिवप्रसाद डोंगरे म्हणाले की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने आमच्या महाविद्यालयाला पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभाची संधी उपलब्ध करून दिली आहे. आज शैक्षणिक वर्ष २०२०-२१च्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार होणार आहे. आजचा कार्यक्रम आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचा आहे असे ते म्हणाले. यावेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सिद्राम डोंगरगे म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसाय अभ्यासक्रम आणि समाजकार्य अशा पाच विविध शाखांचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारे एकमेव महाविद्यालय आहे. आपल्या जीवनामध्ये पदवी प्रमाणपत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे त्यामुळे आपण सर्व आनंदाने त्याचा स्वीकार करावा असे ते म्हणाले. यावेळी कार्यक्रमाचा अध्यक्षिय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष ड.सांबप्पा गिरवलकर म्हणाले की, आज महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि समाजकार्य पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत पदवी प्रदान केली जात आहे याचा मला खूप आनंद होत आहे असे सांगून पदवीचा आपण भविष्यामध्ये आपल्या उज्वल भवितव्यासाठी उपयोग करावा असे ते म्हणाले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कला शाखेतील ८२, वाणिज्य शाखेतील १५३, विज्ञान शाखेतील ७४, पदव्युत्तर विभागातील १३ आणि बीएसडब्ल्यू विभागातील ३२ असे एकूण ४७१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाला या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.संजय गवई, क्रीडा विभागातील डॉ.भास्कर रेड्डी, प्रा.आशिष क्षीरसागर, डॉ.दिनेश मौने, डॉ.दीपक चाटे, डॉ.गुणवंत बिरादार, डॉ.सदाशिव दंदे, डॉ.यशवंत वळवी, डॉ.आनंद शेवाळे, डॉ.शीतल येरुळे, डॉ.राहुल डोंबे, योगिराज माकने, राम पाटील यांच्यासह सर्व समिती सदस्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.रत्नाकर बेडगे, प्रा.सुरेन्द्र स्वामी यांनी केले तर आभार डॉ. श्रीकांत गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमाला वरिष्ठ महाविद्यालयातील पदवी व पदव्युत्तर विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने या कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

# वाडा तालुक्यात ७९ सार्वजनिक तर ७३० घरगुती बाप्पा विराजमान!



**वाडा/प्रतिनिधी**

दोनवर्षाच्या निर्बंधा नंतर या वर्षी गणेशोत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात व थाटात साजरा केला जात आहे. बुधवार दिनांक ३१ ऑगस्ट रोजी वाड्यातील मानाचा समजला जाणारा साई लिला मंडळ, जय भवानी भाजी मार्केट मित्र मंडळ तसेच पोलीस ठाण्याच्या गणेशाचे थाटात स्वागत करण्यात आले. गणेशभक्तांनी भक्तिभावाने वाजत गाजत गणेश मूर्ती आणली व बाप्पाही दिमाखात विराजमान झाले. वाडा तालुक्यात एकूण ७९ सार्वजनिक व ७३० घरगुती गणेश विराजमान झाले आहेत. तर गुरुवारी संध्याकाळच्या सुमारास दीड दिवसाच्या एकूण ४३० घरगुती बाप्पांचे साश्रुनयनांनी विसर्जन करण्यात आले. यंदाच्या या धामधुमीत गणेशोत्सवाला गालबोट लागू नये यासाठी वाडा पोलीस प्रशासना तर्फे ९ अधिकारी, ३२ कर्मचारी, २० होमगार्ड व २० महिला पोलीसांची नेमणूक करण्यात आली आहे. सर्व गणेश मूर्तींचे आगमन शांततेत व संयमाने पार पडले आहे.

05 TO 11 SEPTEMBER 2022 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 9/3/2022 9:02 PM Page 1



# बापरे... सोलापूर जिल्हा परिषदेच्या गाड्यांची ही अवस्था!

## प्रशासनावर विभागीय आयुक्तही भडकले



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्हा परिषदेवर प्रशासक राज सुरू झाल्यापासून पदाधिकाऱ्यांच्या गाड्यांची काय अवस्था आहे, याचे पुरावे पाहून पुणे विभागीय उपायुक्त साकोरे हेही चक्रावून गेले आहेत. सोलापूर जिल्हा परिषदेत ठेकेदारांच्या भाड्याने घेतलेल्या गाड्यांचा करार रद्द करावा व पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी लोकशासन आंदोलन पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजू दिंडोरे, मारुती जाधव यांनी सोमवारी पुणे विभागीय आयुक्तांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण केले. उपोषणकर्त्यांशी पुणे विभागीय उपायुक्त साकोरे यांनी चर्चा करून निवेदन स्वीकारले. आंदोलन करते राजू दिंडोरे यांनी जिल्हा परिषदेत प्रशासकराज सुरू झाल्यावर पदाधिकाऱ्यांच्या गाड्या जमा करण्यात आल्या आहेत. या गाड्या दक्षिण सोलापूर पंचायत समितीच्या कार्यालयाच्या पार्किंगमध्ये धुळखात पडून आहेत. विद्यमान अध्यक्षांची व सभापतींच्या गाड्यांची अवस्था दर्शवणारे फोटोग्राफ्स त्यांनी साकोरे यांना दाखविले. गाड्यांवर साचलेली धूळ व दुरावस्था पाहून साकोरेही चक्रावून गेले. सोलापूर जिल्हा परिषदेच्या ताब्यात पदाधिकाऱ्यांसाठी चांगल्या प्रतीच्या गाड्या आहेत. अध्यक्षांसाठी सफारी आहे. आता या गाड्या प्रशासकाकडे जमा असताना सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य



कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी हे मात्र भाड्याची इनोवा वापरत आहेत. ही इनोव्हा पाणीपुरवठा विभागात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांची आहे. केवळ त्या' कर्मचाऱ्याला पोसण्यासाठी सीईओनी त्याच्या गाड्या भाड्याने लावल्याचे दिसून येत आहे. याबाबत तक्रार करूनसुद्धा सीईओ दिलीप स्वामी यांनी दखल न घेतल्याने आम्हाला विभागीय कार्यालयापर्यंत यावे लागल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. यावर साकोरे यांनी भ्रमणध्वनीवरून सीईओ स्वामी यांना संपर्क साधून योग्य याबाबत योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना केल्याचे आंदोलन करते राजू दिंडोरे यांनी सांगितले.

### 'त्या' कर्मचाऱ्यांचे पद काय?

पाणीपुरवठा विभागातील तो' कर्मचारी जिल्हा व्यवस्थापक म्हणून सर्वत्र मिरवत असतो. पाणीपुरवठा विभागात हे पदच नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ...पान ६ वर



वसई रोड विशाल नगर येथील नंदकिशोर नरसिंह पवार यांच्या निवासस्थानी गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

# प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते राजमाता जिजामाता संकुलात 'विघ्नहर्त्या'ची प्रतिष्ठापना



**लातूर/प्रतिनिधी**

येथील राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलात प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते बुधवारी गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया'चा गजर करीत विघ्नहर्त्या श्री गणरायाची विधीवत पूजन करून प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी बोलताना संकुलाचे प्रमुख प्राचार्य डी. एन. केंद्रे म्हणाले की, सार्वजनिक गणेश उत्सवाची सुरुवात लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी १८९४ साली केली. या काळात गणेशाच्या उपस्थितीत अनेक धार्मिक व सामाजिक सार्वजनिक कार्यक्रम केले जातात. टिळकांनी भारतीयांना एकत्र आणण्यासाठी व विचारांची देवाण - घेवाण करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली होती. भारतीय स्वातंत्र्य लढ्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठाचा वापर केला. गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख - समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. प्रारंभी संस्थेच्या अध्यक्षा के. ए. जायेभाये व प्राचार्य संगमेश्वर केंद्रे यांच्या हस्ते बाप्पांची आरती करण्यात आली. या प्रसंगी संस्थेच्या विधी सल्लागार राणी केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, मुख्याध्यापक स्वाती केंद्रे, प्राचार्य जी.आर. मुंडे, राजीव मुंढे, राजेंद्र जायेभाये, प्रा.कविता केंद्रे, शोभा कांबळे, मदन धुमाळ, सुनीता जवळे, पांडुरंग कुलकर्णी, ए.बी. मुंडे, सुधाकर लोहकरे, शिवकांत वाडीकर, परमेश्वर गित्ते, विष्णू कराड आदी उपस्थित होते.

# लातूर येथे वीरशैव लिंगायत शिवशिंपी समाजाच्या वतीने कोविड योद्धांचा सत्कार



**लातूर/प्रतिनिधी**

वीरशैव लिंगायत शिवशिंपी समाजाच्या वतीने समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांसह कोविड काळात महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या कोविड योद्धांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उदगीर येथील लिंगायत समाज चारिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष नागराज अंबेसंगे, सचिव शैलेश नेरुने, सहसचिव अजय अंबेसंगे यांच्यासह राजशेखर ममदापूरे, चंद्रकांत ममदापूरे, रतिकांत अंबेसंगे यांच्यासह लातूर लिंगायत शिवशिंपी समाजाचे अध्यक्ष दयानंद सावळगी, सचिव रवींद्र अंबेसंगे, प्रा.महादेव छपरे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांसोबतच कोविड कालावधीत जबाबदारी पार पाडणारे श्रीपाद अंबेसंगे, राजकुमार सोंत, योगेश अंबुलगे, विवेकानंद रुग्णालयातील महेश अंबुलगे यांचाही सन्मान करण्यात आला.



वसई रोड पश्चिम प्राथमिक आरोग्य केंद्र येथे राहणारे रमेश विष्णू वाढे यांच्या घरातील श्रीगणराया!



क्राईम संध्या वृत्तपत्राचे सहसंपादक सोनू जाधव यांच्या भगिनी शशिकला साखरकर-जाधव यांच्या गोरेगाव येथील निवासस्थानी गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली.

# कुडूस येथे बस आणि दुचाकीचा अपघात

वाडा : कुडूस येथील ओनीडा कंपनी समोर शुक्रवारी सकाळच्या सुमारास बस व दुचाकीचा समोरासमोर अपघात झाल्याने दुचाकीवरील दोघे जखमी झाले आहेत. कुडूस येथील ओनीडा कंपनिसमोर रस्ता दुरुस्तीचे काम सुरू असल्याने एकेरी वाहतूक चालू आहे. सकाळी वाडा आगाराची जव्हार - ठाणे ही बस कुडूस येथे आली असता समोरून येणाऱ्या दुचाकीस्वाराचे नियंत्रण चुकल्याने तो बसला समोरून नाऊन धडकला यात दुचाकीवरील मुकेश कुमार (३०) याच्या डाव्या पायाला गंभीर व किरकोळ जखम झाली आहे तर प्रदीप राममोहन भारती (१८) हा किरकोळ जखमी झाला आहे दोघेही तालुक्यातील मांगाठणे येथील रहिवाशी आहेत. मुकेश कुमार याला अधिक उपचारासाठी पुढे हलविण्यात आले आहे तर प्रदीप भारती यास घरी सोडण्यात आले आहे.






विरार पुर्वेकडील नवनिशिगंधा सोसायटीमधील सार्वजनिक गणेशोत्सव मोठ्या उत्साहत साजरा करण्यात आला.



विरार पश्चिम येथे राहणारे अनिल चव्हाण (वृत्त छायाचित्रकार) यांचा घरगुती गणेशोत्सव.




